cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-३०९ | शनिवार दि.०७ मार्च २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ‘विकसित महाराष्ट्र’चे स्वप्न की आश्वासनांचा पाऊस ?

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना तो दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना समर्पित केला. अजित पवार यांनी ११ वेळा अर्थसंकल्प मांडत राज्याच्या आर्थिक शिस्तीला दिशा दिली, असे सांगत त्यांच्या नावाने भव्य स्मारक उभारण्याची आणि नागरी पुरस्कार सुरु करण्याची घोषणाही करण्यात आली. भावनिक सुरुवातीने सुरु झालेला हा अर्थसंकल्प पुढे ‘‘विकसित महाराष्ट्र २०४७’’ या मोठ्या ध्येयाभोवती फिरताना दिसतो.

# शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंत कर्जमाफी !

## अर्थसंकल्पात घोषणा; मुख्यमंत्री फडणवीसांचा मोठा निर्णय

मुंबई । प्रतिनिधी

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात केली आहे. ३० सप्टेंबर २०२५ पीककर्ज थकीत असलेल्या शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी देण्यात येणार आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार प्रोत्साहनपर अनुदान योजना राबवण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी शुक्रवारी (दि.६) अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली आहे.**

मुख्यमंत्री म्हणाले, ‘‘राज्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. त्यासाठी समिती गठीत केली आहे. राज्यातील ३० सप्टेंबर २०२५ रोजी पीक कर्ज थकीत पात्र शेतकऱ्यांना २ लाखा रुपयांपर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना जाहीर करत आहे.‘‘ अशी घोषणा त्यांनी केली. मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, जे शेतकरी कर्ज घेऊन नियमित परतफेड करतात अशा शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूने नियमित कर्ज परतफेड केलेली असल्यास अशा पात्र शेतकऱ्यांना ५० हजार

▶▶ पान २ वर



### शेती समृद्ध तर रोजगार निर्मितीत होणार क्रांती -धनंजय मुंडे



स्व. अजितदादांच्या विकासाच्या व्हिजनला आजचा अर्थसंकल्प समर्पित करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस यांनी २०४७ सालच्या विकसित महाराष्ट्राच्या पायाभरणीचा नवीन अध्याय आज सभागृहात मांडला असून महाराष्ट्राला ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्याच्या दृष्टीने आजचा अर्थसंकल्प प्रगतिशील, शाश्वत, सुशासन आणि सर्वसमावेशक अशा चार स्तंभांच्या माध्यमातून राज्याच्या चौफेर विकासाची चतुसूत्री मांडणारा हा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली आहे. २५ सप्टेंबर, २०२५ पर्यंत कर्ज घेतलेल्या पात्र शेतकऱ्यांचे २ लाख पर्यंतचे कर्ज माफ करणे तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान देण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची घोषणा ही महायुती सरकारवर जनतेने टाकलेल्या विश्वासबद्दलची कृतज्ञता आहे. या निर्णयाबद्दल सर्व शेतकरी बांधवांचे मनापासून अभिनंदन करतो, असेही धनंजय मुंडे म्हणाले.

### मुख्यमंत्र्यांकडून अजित पवारांच्या कार्याचा गौरव



अर्थसंकल्पीय भाषणादरम्यान मुख्यमंत्र्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री आणि माजी अर्थमंत्री अजित पवार यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या सन्मानार्थ दोन मोठ्या घोषणा केल्या. अर्थसंकल्प मांडताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस भावूक झाले होते. यावेळी देवेंद्र फडणवीसांनी अजित पवार यांचे राज्याच्या अर्थकारणातील योगदान अधोरेखित केले. अजितदादा आज आपल्यात नाहीत, पण त्यांचे आणि अर्थसंकल्पाचे नाते अतिशय दृढ होते. त्यांनी विक्रमी ११ वेळा राज्याचा अर्थसंकल्प मांडला आहे. कामाचा माणूस हीच त्यांची खरी ओळख होती. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी अजितदादांच्या व्यक्तिमत्त्वाला आणि त्यांच्या कर्तृत्वाला साजेसे एक भव्य स्मारक राज्य सरकारतर्फे उभारण्यात येणार आहे. तसेच प्रशासकीय कामात आणि नागरी सोयीसुविधांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांसाठी ‘अजित पवार गतिमान नागरी सन्मान’ हा पुरस्कार सुरू करण्यात येणार आहे. हा अर्थसंकल्प मी पूर्णपणे अजितदादांना समर्पित करत आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी आपला आदर व्यक्त केला.

### कर्जमाफीच्या घोषणेसह शेतकऱ्यांसाठी ५ महत्त्वाच्या घोषणा

**कृषी समृद्धी योजना** - कृषी समृद्धी योजनेसाठी २०२६-२७ ते २०२९-३० या चार वर्षांच्या कालावधीत राज्यातील कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. राज्य सरकारने मागील वर्षीच कृषी समृद्धी योजनेची घोषणा केली होती. या योजनेतून कृषी क्षेत्रातील भांडवली गुंतवणुकीसाठी पुढील पाच वर्षांसाठी २५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याचे जाहीर केले होते. त्यासाठी प्रत्येक वर्षी ५ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल, अशी ग्वाही दिली. परंतु पहिल्याच वर्षी या योजनेसाठी निधीला हात आखडता घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पात पुन्हा या योजनेचा उल्लेख केला आहे.

**नैसर्गिक शेती** - राज्यातील ५ लाख हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणून सकस व पोषणयुक्त शेतीमाल उत्पादनासाठी आगामी दोन वर्षात महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियान या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**गोपीनाथ मुंडे अपघात योजना** - गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजनेत शेतमजुरांचा समावेश करण्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी अर्थसंकल्पात केली आहे. या योजनेतून शेतमजूरांना अपघात झाल्यास आर्थिक मदत दिली जाणार आहे.


**पशुपालनासाठी योजना** - मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना सुरु करण्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीस यांनी केली. मुख्यमंत्री म्हणाले, राजाच्या कृषी उत्पन्नात २५ टक्के वाटा आहे. त्याची व्याप्ती वाढवण्यासाठी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन योजना सुरु करण्यात आल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. तसेच पशुपालनासाठी महिला शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे.

**मत्स्य विकासासाठी १ हजार २४० कोटी** - राज्यातील मत्स्य व्यवसाय विकाससाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात १ हजार २४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. यामध्ये मत्स्य व्यवसायासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येणार असून मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना राबवण्याची घोषणा मुख्यमंत्री फडणवीसांनी केली.

### लाडकी बहीण योजना सुरूच राहणार

**राज्यातील लाडकी बहीण योजना सुरूच राहणार असल्याची घोषणा अर्थमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त या योजनेच्या निधीत भरीव तरतूद केली जाणार असल्याचेही ते म्हणाले. या योजनेसाठी आता भरीव तरतूद करण्यात आली असून, पात्र लाडक्या बहिणींनी दरमहिना मिळणाऱ्या हप्त्यामध्ये वाढ होण्याची शक्यताही वर्तवली जात आहे. आतापर्यंत ३७ लाख लखपती दीदी झाल्या असल्याचेही अर्थमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. तसेच आणखी २५ लाख बहिणींनी लखपती दीदी करण्याचे उद्दिष्ट असल्याचेही ते म्हणाले.**

### आश्वासन कर्जमुक्तीचे; मात्र अटी-शर्थीसह शेतकऱ्यांची फसवणूक - उद्धव ठाकरे



मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांचा सातबारा पूर्णतः कोरा करण्याचे आश्वासन दिले होते; मात्र प्रत्यक्षात फक्त दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर करून शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे, अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली. सादर झालेल्या राज्याच्या अर्थसंकल्पावर प्रतिक्रिया देताना त्यांनी ही भूमिका मांडली. आमच्या सरकारच्या काळात दोन लाखांपर्यंतची कर्जमाफी कोणत्याही अटींशिवाय दिली होती, असे त्यांनी सांगितले. सध्याच्या अर्थसंकल्पात अटी-शर्थींचा खेळ असून, शेतकऱ्यांना प्रत्यक्षात फायदा होणार नाही, असा आरोपही त्यांनी केला. कर्जमाफीची स्पष्ट मुदत जाहीर करण्याची मागणी त्यांनी केली.

#### :: हे होणार स्वस्त ::

मधुमेहावरील उपचार, कर्करोगवरील औषधं, क्रीडा साहित्य, वैद्यकीय उपकरणे, सौर पॅनल.

#### :: हे होणार महाग ::

दारु, सिगारेट, तंबाखूजन्य पदार्थ.

### मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या प्रकरणी २,५७४ वारसांना आर्थिक मदत

शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणी महसूल व वन विभागाच्या निकषांनुसार वारसांना मदत दिली जाते. मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या प्रकरणी पात्र प्रकरणांची संख्या २,५९० असून त्यापैकी २,५७४ शेतकऱ्यांच्या वारसांना आर्थिक मदत देण्यात आली आहे, अशी माहिती राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी शुक्रवारी (दि. ६ मार्च) विधानपरिषदेत दिली आहे. याबाबत आमदार राजेश राठोड, सतेज पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी आणि इतरांनी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. त्यावर मदत व पुनर्वसन मंत्र्यांनी लेखी उत्तर दिले.

### राज्यात ७५ हजार पदांची भरती करणार - मुख्यमंत्री

पुढील काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोग तसेच इतर भरती यंत्रणांच्या माध्यमातून आणखी ७५ हजार पदांची भरती करण्यात येणार आहे. ही भरती विविध विभागांमध्ये केली जाणार असून, प्रशासनातील मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यावर भर दिला जाणार आहे. सरकारी नोकरीची वाट पाहणाऱ्या लाखो तरुणांसाठी ही घोषणा महत्त्वाची मानली जात आहे. गेल्या काही वर्षांपासून सरकारी भरतीची मागणी करण्यात येत होती. त्यानुसार आता राज्य सरकारने मोठ्या प्रमाणावर पदभरती करण्याचा निर्णय घेतला आहे.

### महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर होणार

महाराष्ट्र देशात अर्थिक अंजिन असल्याने आपला वाटा मोठा असेल. राज्याची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलर होणार आहे. विकसित महाराष्ट्राचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पात पाहायाला मिळणार आहे. राज्याचे व्हिजन डॉक्युमेंट तयार केले आहे. प्रादेशिक संतुलित विकासासाठी चार प्रमुख स्तंभ ठरवले आहेत, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. चार स्तंभाखाली १६ उपक्षेत्र ठरवले आहेत. प्रत्येक अर्थसंकल्पात त्याची छबी दिसेल, असेही देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# इंडिया आघाडीने अजित पवारांच्या विमान अपघाताचा मुद्दा लावून धरावा

## राहुल गांधींच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करावी-रोहित पवारांची मागणी

पुणे । प्रतिनिधी

राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात २८ जानेवारीला मृत्यू झाला होता. या घटनेनंतर हा अपघात ही घात असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत विविध शंका उपस्थित करत चौकशी करत कारवाई करण्याची मागणी केली आहे. तसेच अजित पवारांच्या विमानाच्या अपघाताबद्दल विरोधी पक्षांच्या नेत्यांची समिती स्थापन करण्यात यावी आणि त्याचे अध्यक्षपद राहुल गांधींकडे देण्यात यावे, असे मत देखील रोहित पवारांनी व्यक्त केले आहे. त्यांनी शुक्रवारी

▶▶ पान २ वर



# २४६७ कोटींच्या मनी लॉन्ड्रिंग ईडी कडून अर्चना कुटेना अटक!

## ७ मार्चपर्यंत सुनावली कोठडी

बीड । प्रतिनिधी

अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) आर्थिक गैरव्यवहार आणि मनी लॉण्ड्रिंग एका प्रकरणात मोठी कारवाई केली आहे. मुंबई विभागीय कार्यालयाने अर्चना कुटे यांना अटक केली आहे. ईडीने त्यांना प्रिव्हेंशन ऑफ मनी लॉण्ड्रिंग ॲक्ट २००२ अंतर्गत अटक



केली आहे. ही कारवाई ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड आणि त्यासंबंधीत जोडलेल्या आर्थिक घोटाळ्यांच्या तपासासाठी करण्यात आली आहे. अर्चना सुरेश कुटे यांना अटक केल्यानंतर मुंबई येथील विशेष पीएमएलए कोर्टात हजर करण्यात आले. पुढील तपासासाठी न्यायालयाने कुटे यांना ७ मार्चपर्यंत ईडी कोठडी ठोठावली आहे.

इडीकडून जारी करण्यात आलेल्या प्रेस नोटमध्ये म्हटले आहे

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०६ मार्च २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २५०.०० क्विंटल | १,८०५ | २,७२६ | २,२४८ |
| ज्वारी/हायब्रिड: १२८.५० क्विंटल | १,७०० | ४,३२६ | ३,१७५ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : १७.५० क्विंटल | ६,००० | ७,६०१ | ६,९५० |
| उडीद : ५.५० क्विंटल | ५,२०० | ५,२०० | ५,२०० |
| बाजरी: २३.५० क्विंटल | २,३१० | ३,०६१ | २,७५५ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: ५०.०० क्विंटल | ५,३०० | ५,३५० | ५,३२५ |
| हरभरा: ३०.०० क्विंटल | ४,८०० | ५,००१ | ४,९१२ |

# आरटीई प्रवेशासाठी १ किलोमीटरची अट बेकायदेशीर?

## नागपूर खंडपीठाने महाराष्ट्र सरकारला बजावली नोटीस

नागपूर । प्रतिनिधी

**मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शिक्षण हक्क कायद्यांतर्गत प्रवेशासाठी घरापासून १ किलोमीटरच्या आत शाळा असणे बंधनकारक करणाऱ्या नव्या नियमाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर महाराष्ट्र सरकार आणि राज्य शालेय शिक्षण विभागाला नोटीस बजावली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील शंकर बाबुराव आत्राम यांनी ही याचिका दाखल केली आहे.**

न्यायमूर्ती राज वाकोडे आणि न्यायमूर्ती अनिल किलोर यांच्या खंडपीठाने दिलेल्या आदेशात नोंदवले की याचिकाकर्ते अनुसूचित जमातीचे सदस्य असून त्यांनी आपल्या मुलासाठी




२५ टक्के कोट्यांतर्गत प्रवेशासाठी अर्ज करण्याचा प्रयत्न केला. मात्र घरापासून १ किलोमीटरच्या आत कोणतीही शाळा उपलब्ध नसल्याने ते अर्जच करू शकले नाहीत. या प्रकरणावर पुढील सुनावणी ९ मार्च रोजी होणार आहे. महाराष्ट्र सरकारने फेब्रुवारी २०२६ मध्ये नवीन नियम जाहीर केले. या नियमांनुसार प्रवेश

▶▶ पान २ वर

# राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंध यांची वाटचाल अंधकाराकडे-राहुल गांधी

दिल्ली । वृत्तसंस्था

सध्याचे राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंध ज्ञानाचा प्रकाश सोडून अंधाराकडे वेगाने धावत असल्याचे प्रतिपादन लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी शुक्रवारी केले. आजच्या काळात कोणालाही दुसऱ्याचे म्हणणे समजून घेण्यात रस नसून, केवळ मतभेदापोटी हिंसेचा मार्ग अवलंबला जात असल्याबद्दल त्यांनी तीव्र चिंता व्यक्त केली.

महात्मा गांधी आणि थोर समाजसुधारक श्री नारायण गुरू यांच्या ऐतिहासिक भेटीला १०० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आयोजित एका विशेष कार्यक्रमात राहुल गांधी बोलत होते. यावेळी त्यांनी सद्यस्थितीतील राजकीय संघर्षावर भाष्य करताना




सांगितले की, देशांतर्गत राजकारण असो किंवा जागतिक संबंध, सर्वत्र संवाद हरवत चालला आहे. आपण एखाद्या व्यक्तीशी किंवा विचाराशी असहमत असतो, तेव्हा त्याला समजून घेण्याऐवजी त्याच्यावर थेट हल्ला केला जातो किंवा हिंसक मार्गाने त्याला दाबण्याचा प्रयत्न केला जातो, असे गांधी म्हणाले.

▶▶ पान २ वर

छत्रपती संभाजी नगर (धुत हॉस्पिटल) येथील सुप्रसिध्द डॉक्टर
आता आपल्या बीडमध्ये उपलब्ध
डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे
एम.बी.बी.एस., एम.डी.,
मानसोपचार तज्ञ ( Gold Medalist)
न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट
मो.9518551503 / 9545615352



महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात
सकाळी : १०.०० ते दुपारी २.०० वा.
साई (गवते) कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड, डॉक्टर लाईन, बस स्टॅण्डच्या पाठीमागे, बीड
दुपारी २.३० ते ६.०० वा. डॉ.विश्वास जोशी यांच्या दवाखान्या समोर
प्रगती होमिओ क्लिनिक धोंडीपुरा, टिळक रोड, बीड
खालील आजारांचे निदान व उपचार
● डोकेदुखी / अती चिंता व काळजी
➡ (सतत टेन्शन, घाबरटपणा, घाम सुटणे, थरकाप सुटणे, हाता-पायात मुंग्या येणे)
● झोपेच्या समस्या
➡ (झोप न येणे, झोपेत चालणे, बडबड करणे, चक्कर येणे, दातखिळी बसणे)
● व्यसनाधिनता : (दारु, तंबाखू, गुटखा, धुम्रपान)
● बालकांच्या समस्या :
➡ (झोपेत लघवी करणे, हट्टीपणा, चिडचीडेपणा, अभ्यासात कमी)
● स्मृती भंग (विसरभोळेपणा)
● लैंगिक समस्या
➡ (लवकर वीर्य पतन होणे, सेक्सची इच्छा न होणे, कमजोरी, स्वप्नदोष)
● स्क्रिझोफ्रेनिया व इतर मानसिक समस्या



नोंदणी व अधिक माहितीसाठी संपर्क
मो. 8237353737 / 8182839922
कु.डॉ.जयश्री श्रीराम टेकाळे (M.B.B.S.) वैद्यकिय अधिकारी, मो.7743990988
श्रीराम टेकाळे (पुर्व गट शिक्षणाधिकारी, पाटोदा/शिरुर/बीड) सामाजिक कार्यकर्ते, पाटोदेकर मो.9075387638

cmyk

cmyk



अग्रलेख

# ‘विकसित महाराष्ट्र’चे स्वप्न की आश्वासनांचा पाऊस ?

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा अर्थसंकल्प विधानसभेत सादर करताना तो दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना समर्पित केला. अजित पवार यांनी ११ वेळा अर्थसंकल्प मांडत राज्याच्या आर्थिक शिस्तीला दिशा दिली, असे सांगत त्यांच्या नावाने भव्य स्मारक उभारण्याची आणि नागरी पुरस्कार सुरू करण्याची घोषणाही करण्यात आली. भावनिक सुरुवातीने सुरू झालेला हा अर्थसंकल्प पुढे ‘‘विकसित महाराष्ट्र २०४७’’ या मोठ्या ध्येयाभोवती फिरताना दिसतो. सरकारने शेती, उद्योग, पायाभूत सुविधा आणि सामाजिक क्षेत्र अशा चार स्तंभांवर राज्याचा विकास आराखडा उभा करण्याचा दावा केला आहे. मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना, महाराष्ट्र नैसर्गिक शेती अभियान, मुख्यमंत्री मत्स्यसंपदा योजना, मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजना यांसारख्या नव्या योजना जाहीर करताना शेतकऱ्यांना कर्जमाफीची घोषणाही करण्यात आली आहे. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा करण्यात आली.

याशिवाय मुंबई-पुणे आर्थिक केंद्र, १२०० किलोमीटर मेट्रो जाळे, ६००० किलोमीटर द्रुतगती मार्ग, बुलेट ट्रेन स्थानके, १० प्रादेशिक विकास प्राधिकरणे, १० लाख घरे, एआय विभाग, डिजिटल तंत्रज्ञान अभियान अशा मोठ्या योजनांची मालिकाच या अर्थसंकल्पात मांडण्यात आली. सरकारच्या मते, हा अर्थसंकल्प ‘‘प्रगतीशील, शाश्वत आणि सर्वसमावेशक’’ महाराष्ट्राकडे नेणारा आहे. मोठ्या घोषणांचा पाऊस या अर्थसंकल्पात पायाभूत सुविधांवर मोठा भर दिला असल्याचे स्पष्ट दिसते.

मुंबईतील मेट्रो मार्गिका, भुयारी मार्ग, विमानतळ जोडणाऱ्या योजना तसेच नागपूर, नाशिक, पुणे आणि छत्रपती संभाजीनगरला ग्रोथ हब म्हणून विकसित करण्याचा आराखडा मांडण्यात आला आहे.

राज्याची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे ध्येयही सरकारने मांडले आहे. उद्योग क्षेत्रात गुंतवणूक वाढवण्यासाठी नवीन गुंतवणूक धोरण, जिल्हानिहाय सूक्ष्म आणि लघुउद्योग केंद्रे, गेमिंग उद्योगाला चालना देण्यासाठी २९५ स्टुडिओ उभारण्याचा प्रयत्न, अशा घोषणा करण्यात आल्या. शेती क्षेत्रासाठी सौर कृषी वाहिनी, दिवसा वीजपुरवठा, बळीराजा वीज सवलत योजना, नैसर्गिक शेती अभियान अशा योजना जाहीर करत शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मात्र या अर्थसंकल्पावर विरोधकांनी जोरदार टीका केली आहे. त्यांच्या मते हा अर्थसंकल्प प्रत्यक्षात विकासाचा आराखडा नसून घोषणांचा पाऊस आहे. विरोधी पक्षांचे म्हणणे आहे की, गेल्या काही वर्षांत ज्या अनेक योजना जाहीर झाल्या त्यांची अंमलबजावणी अद्याप पूर्ण झालेली नाही. अशा परिस्थितीत नव्या योजनांची मालिका जाहीर करणे म्हणजे जनतेला स्वप्ने दाखवण्यासारखे आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची घोषणा केली असली तरी प्रत्यक्ष लाभ किती शेतकऱ्यांना मिळणार, याबाबत स्पष्टता नसल्याचा आरोपही विरोधकांनी केला आहे. राज्यातील शेती क्षेत्राचा विकासदर घटत असताना केवळ घोषणांनी परिस्थिती बदलणार नाही, असे त्यांचे मत आहे. पायाभूत सुविधांवरील मोठ्या प्रकल्पांसाठी प्रचंड निधी लागणार असताना राज्याच्या आर्थिक स्थितीवर त्याचा किती ताण येणार, याबाबतही विरोधकांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. कर्जाचा बोजा वाढत असताना इतक्या मोठ्या प्रकल्पांची घोषणा वास्तववादी आहे का, असा सवालही केला जात आहे. महिलांसाठी सुरू असलेली ‘‘माझी लाडकी बहीण’’ योजना सुरू ठेवण्याची घोषणा सरकारने केली आहे. तसेच ‘‘लखपती दीदी’’ योजनेचा विस्तार करण्याचाही निर्णय घेतला आहे. परंतु विरोधकांच्या मते या योजना निवडणूकपूर्व राजकारणाचा भाग आहेत. रोजगारनिर्मिती, उद्योगवाढ आणि शेतीसाठी स्थिर धोरणे तयार करण्याऐवजी थेट आर्थिक मदतीच्या योजनांवर भर देण्यात येत असल्याची टीका विरोधकांनी केली आहे.

एकूणच पाहता, या अर्थसंकल्पात विकासाचे मोठे चित्र रंगवले गेले आहे. २०४७ पर्यंत विकसित महाराष्ट्र घडवण्याचे ध्येय निश्चितच महत्त्वाकांक्षी आहे. मात्र घोषणांपेक्षा अंमलबजावणी अधिक महत्त्वाची असते.

शेतकरी, बेरोजगारी, महागाई, ग्रामीण विकास यांसारख्या मूलभूत प्रश्नांवर प्रत्यक्ष परिणाम दिसणे हीच या अर्थसंकल्पाची खरी कसोटी ठरणार आहे.

सरकारने दाखवलेले ‘‘विकसित महाराष्ट्र’’चे स्वप्न आकर्षक आहे; परंतु ते वास्तवात उतरवण्यासाठी केवळ घोषणांचा पाऊस नव्हे, तर ठोस आणि पारदर्शक अंमलबजावणी आवश्यक आहे.

# नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनातील सर्व यंत्रणा काम करणा-जिल्हाधिकारी आशिमा मित्तल

जालना । प्रतिनिधी

**महसूल विभागांतर्गत क्षेत्रिय स्तरावर ग्रामिण भागात सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिला यांचे महसूल विभागांशी संबंधित दैनंदिन प्रश्नांचे निराकरण करणे व जनतेच्या तक्रारी सत्वर निकाली काढणे, तसेच महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयातील तालुक्यामध्ये मंडळ स्तरावर ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत ‘‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान‘‘ टप्पा १ आयोजित करण्यात येणार आहे. या कालावधीत आयोजित शिबीरादरम्यान प्रत्येक गावातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रशासनातील सर्व यंत्रणा प्रयत्न करणार आहेत असे जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी सांगितले.**

दि. ५ मार्च २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे जिल्हाभरात दि. ७ मार्च २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्वव समाधान शिबीर अभियान टप्पा १ च्या अनुषंगाने आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, प्रभारी उप जिल्हा निवडणूक अधिकारी श्रीमती सुकेशिनी कांबळे-पगारे यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. यावेळी पत्रकार परिषदेत पुढे बोलतांना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल म्हणाल्या की, महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने राबविण्यात येणार असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्वव समाधान शिबिरांच्या माध्यमातून शासनाकडून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध नाविन्यपूर्ण योजना तसेच लोकाभिमुख प्रशासनासाठी निर्गमित करण्यात आलेले शासन निर्णय व योजनांची माहिती नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या शिबीरा दरम्यान प्रत्येक गावातील नागरिकांच्या महसूल व इतर शासकीय योजनांशी संबंधित प्रलंबित समस्या या शिबिरांच्या माध्यमातून तात्काळ सोडविण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी संबंधित गावातील नागरिकांनी आपल्या प्रलंबित समस्या, अडचणी, तक्रारी ह्या मंडळ अधिकारी यांच्याकडे देणे बंधनकारक राहील. संबंधित मंडळात ज्यावेळी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरांचे आयोजन केले जाणार आहे त्या दिवशी संबंधित विभागाचे अधिकारी या समस्या प्राधान्याने सोडविण्यासाठी प्रयत्न करणार आहेत. तसेच या शिबीरा दरम्यान महाराष्ट्र शासनाकडून जालना जिल्ह्यात एकूण ६५ ठिकाणी ‘‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर’’ आयोजित करण्यात येणार असून मंडळ स्तरावर या शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्येक शिबिरात महसूल, ग्रामविकास,



पंचायत राज, सामाजिक न्याय, कृषी, आरोग्य आदी विभागांचे अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या अर्जांची तात्काळ दखल घेतील. ७ मार्च ते १५ मे २०२६ या कालावधीत मंडळ व नगर परिषद/नगर पंचायत स्तरावर राबविण्यात येणार असून सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांचे महसूल विषयक प्रश्न तात्काळ निकाली काढणे हा प्रमुख उद्देश आहे. प्रत्येक तालुक्यात एकदिवसीय समाधान शिबिरे आयोजित करून प्रलंबित फेरफार, ७/१२ दुरुस्ती, उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्रे यांसारख्या सेवा ‘सिंगल डे सर्व्हिस डिलिव्हरी’ तत्त्वावर देण्यात येणार आहेत.अभियानाच्या पूर्वतयारीत गावनिहाय प्रलंबित प्रकरणांची यादी तयार करून शिबिरापूर्वी आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करावी. ७/१२ व ८अ उताऱ्यांचे अद्ययावतीकरण, डिजिटल ७/१२ ची जनजागृती, तसेच एकवेळच्या अधिमूल्य भरणा पद्धतीबाबत नागरिकांना मार्गदर्शन करावे. तुकडेबंदी कायद्याशी संबंधित प्रकरणे, संपादन व अकृषी परवानगी नोंदींची अद्ययावत माहिती शिबिरात उपलब्ध करून द्यावी, असेही त्यांनी सांगितले. तसेच ‘एक खिडकी व्यवस्था’ प्रभावीपणे राबवून सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध राहतील .शिबिरांची व्यापक प्रसिद्धी करून जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, यासाठी सोशल मीडिया, स्थानिक माध्यमे व दवंडीचा वापर करण्यात येणार आहे. शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार भोगवटदार वर्ग २ जमिनी भोगवटदार वर्ग १ मध्ये परावर्तित करण्यात आल्या किंवा नाहीत याची तपासणी मंडळ स्तरावर करणे व अशा काही जमिनी वर्ग १ मध्ये परावर्तित करणे बाकी असल्यास त्याबाबत वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार पुर्वतयारीच्या कालावधीत प्रक्रिया पुर्ण करावी व अद्यावत नोंदीसह ७/१२ लाभार्थ्यांना वितरीत करावे. ब) जिवंत ७/१२ मोहिमेअंतर्गत यापुर्वीच शासनामार्फत सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने सर्व गावा मध्ये ७/१२ वाचन पूर्ण करून प्रलंबीत नोंदीच्या याद्या तयार कराव्या व त्याअनुषंगाने दुरूस्तीबाबत कार्यवाही शिबीरापुर्वी पुर्ण करून घेणे. शिबीरात अद्यावत अभिलेख अर्जदारांना उपलब्ध करून द्याव्या. क) सामाजिक अर्थसहाय्य योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे अर्ज शिबीरापुर्वी भरून घेणे व समितीच्या बैठकीचे आयोजन करून लाभ मंजुर करून घ्यावे व शिबीरात मंजुरी आदेशाचे वितरण करावे. ड) तुकडेबंदी कायद्याविरूध्द दिनांक १५.११.१९६५ ते १५.१०.२०२४ पर्यंत प्रमाणभूत सीमेपेक्षा कमी क्षेत्राच्या जमीनीचे खरेदी विक्रीचे व्यवहार व हस्तांतरण बाबत गावनिहाय यादी तयार करावी. इ) नोंदणीकृत दस्ताचे आधारे रद्द झालेली, तुकडेबंदी कायद्याच्या उल्लघंनामुळे ७/१२ मधील इतर अधिकारातील खरेदीदारांचे नाव, इतर अधिकारात नोंदविलेले शेरे, तसेच नव्याने प्राप्त अर्जाविषयी फेरफार घेणे. अनोंदणीकृत व्यवहाराविषयी गाव निहाय माहिती गोळा करून नोंदणीकरीता नोंदणी विभागाकडे पाठविणे. ७/१२ अद्यावत करून शिबीराच्या दिवशी अद्यावत ७/१२ चे वाटप करावे ई) मंडळ स्तरावरील सर्व शाळांचा आढावा घेऊन दाखले वाटप न झालेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या तयार करणे. शाळेमध्ये वर विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज भरून घेणे. शिबीराच्या दिवशी दाखल्यांचे वाटप करावे. उ) उपविभागीय स्तरीय समितीने शासन निर्णय क्र.लवेसू२०२५/प्र.क्र.०२/पाणंद रस्ते, दिनांक १४/१२/२०२५ नुसार शिबीर आयोजित करावायाच्या मंडळातील पाणंद रस्त्यांची प्रशासकीय मान्यतेचे आदेश ग्रामपंचायतला उपलब्ध करुन द्यावे. ऊ) मंडळातील सर्वांसाठी घरे अंतर्गत पट्टे वाटपासाठी बाकी राहिलेल्या लाभार्थ्यांची यादी तयार करणे. तसेच संबंधीत शासन निर्णयातील तरतुदीनुसार पुर्वतयारीच्या कालावधीत प्रक्रिया पूर्ण करावी व शिबीरात पट्टे वाटप करावे.

# किशोरवयीन मुलांना झोपेची अधिक गरज, अपुऱ्या झोपेचा आरोग्यावर परिणाम-डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

वेगवान शारीरिक आणि मानसिक विकासाच्या टप्प्यात असलेल्या किशोरवयीन मुलांना प्रौढांपेक्षा अधिक झोपेची आवश्यकता असते. शारीरिक वाढ, मेंदूची परिपक्वता आणि भावनिक संतुलन या सर्व प्रक्रियांमध्ये झोपेची महत्त्वाची भूमिका असल्याने १३ ते १८ वयोगटातील मुलांनी दररोज किमान ८ ते १० तास झोप घेणे आवश्यक असल्याचे श्वसन व निद्रारोग तज्ज्ञांचे म्हणने आहे. अपुरी झोप ही केवळ थकवा आणणारी बाब नसून तिचा थेट परिणाम मुलांच्या विविध वस्तू जाणण्याच्या क्षमतेवर होतो. लक्ष केंद्रित करण्यात अडथळे, समस्या सोडवण्यातील कमतरता आणि स्मरणशक्ती कमी होणे यामुळे शैक्षणिक कामगिरी घसरू शकते. परीक्षेच्या काळात उशिरापर्यंत जागरण करण्याची सवय उलट परिणामकारक ठरू शकते. भावनिक आणि वर्तणूक आरोग्यावरही झोपेच्या अभावाचा परिणाम दिसून येतो. पुरेशी झोप न मिळाल्यास चिडचिड, अतिसक्रियता, नैराश्याची लक्षणे तसेच भावना नियंत्रित करण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. मुलांची वाढ हार्मोन प्रामुख्याने गाढ झोपेदरम्यान स्त्रवतो, त्यामुळे शारीरिक वाढीसाठीही नियमित आणि दर्जेदार झोप अत्यावश्यक आहे. याशिवाय, झोपेअभावी प्रतिकारशक्ती कमी होउन संसर्गाचा धोका वाढू शकतो. पालक आणि शाळांनी निरोगी झोपेच्या सवयी रुजविण्यासाठी पुढाकार घ्यावा. नियमित झोपेचे वेळापत्रक, झोपण्यापूर्वी मोबाईल किंवा स्त्रक्रीनचा मर्यादित वापर आणि शांत झोपेचे वातावरण निर्माण करणे या उपाययोजना किशोरवयीन



मुलांच्या सर्वांगीण आरोग्यासाठी उपयुक्त ठरू शकतात, असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडेलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# जालना महापालिकेच्या पहिल्या सभेत समित्यांची घोषणा:आंबेकर, मुळे यांची निवड

जालना । प्रतिनिधी

**जालना शहर महानगरपालिकेची विशेष महासभा मनपा प्रशासकीय इमारतीमधील नवीन सभागृहात जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल व महापौर श्रीमती वंदना अरुण मगरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या ऐतिहासिक पहिल्या सभेत महानगरपालिकेच्या विविध महत्त्वपूर्ण समित्यांची स्थापना आणि स्वीकृत सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.**

स्वीकृत सदस्यांचे निवड महानगरपालिका अधिनियम आणि नियमांनुसार, महापालिकेच्या ४ स्वीकृत सदस्यांचे निवड झाल्याचे आजच्या सभेत जाहीर करण्यात आले. यामध्ये खालील उमेदवारांचा समावेश आहे: श्री. विनोद रत्नपारखे, श्री. आश्विन भास्कर आंबेकर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (शिवसेना गट) श्री. सिद्धिविनायक मुळे (भा. ज. पा.) श्री. अर्जुन कबूलमल गेही (भा. ज. पा.) स्थायी समिती व विशेष समित्यांची स्थापना महानगरपालिकेच्या कामकाजात गती आणण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या



स्थायी समितीसह पाच विशेष समित्यांची स्थापना करण्यात आली: स्थायी समिती: या समितीसाठी एकूण १६ सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले आहे. विशेष समित्या: प्रत्येक समितीमध्ये १६ सदस्यांची निवड करण्यात आली असून खालील पाच समित्या जाहीर करण्यात आल्या असून लवकरच समिती सभापती निवड करण्यात येणार आहे. महिला व बाल कल्याण समिती बांधकाम समिती पाणीपुरवठा व जलनिस्सारण समिती . शिक्षण व विद्युत समिती स्वच्छता व आरोग्य समिती सभेतील इतर कामकाज या सभेमध्ये दिनांक ०९/०२/२०२६ रोजी झालेल्या मागील विशेष सभेचे इतिवृत्त कायम करण्यात आले. तसेच महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींनुसार प्रभाग समित्या स्थापन करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. या सभेला उपमहापौर राजेश राऊत, आयुक्त आशिमा मित्तल, अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपायुक्त नंदा गायकवाड, उपायुक्त त्र्यंबक कांबळे, नगरसचिव तथा सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण यांच्यासह महानगरपालिकेचे सर्व सन्माननीय सदस्य आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नवीन समित्यांच्या स्थापनेमुळे आता जालना शहराच्या विकासकामांना खऱ्या अर्थाने गती मिळेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# दुबईत युद्धजन्य तणाव; हजारो भारतीय अडचणीत-खा.डॉ.कल्याण काळे

जालना । प्रतिनिधी

**दुबईमध्ये अचानक निर्माण झालेल्या युद्धजन्य तणावपूर्ण परिस्थितीत हजारो भारतीय नागरिक अडचणीत सापडल्याची माहिती समोर आली असून या प्रकरणी केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्याबद्दल जालना मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ‘‘जर एका खासदारालाही परराष्ट्र मंत्रालयाकडून प्रतिसाद मिळत नसेल, तर सर्वसामान्य भारतीय नागरिकांची परिस्थिती काय असेल याची कल्पना करता येते,’’ असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.**

खा.डॉ. काळे यांनी सांगितले की, ते २७ फेब्रुवारी रोजी मुंबईमार्गे दुबईला गेले होते. २८ फेब्रुवारी रोजी दुबई येथे पोहोचल्यानंतर ते आपल्या परिवारासह तसेच आणखी दोन परिवारांसोबत हॉटेलकडे जात असताना परिसरात अचानक युद्धजन्य तणाव निर्माण झाल्याची माहिती मिळाली. या घटनेमुळे तेथील वातावरणात मोठा तणाव निर्माण झाला आणि परतीचा प्रवास कधी होणार याबाबत अनिश्चितता



निर्माण झाली. त्या काळात इराणसंबंधित वाढत्या तणावामुळे परिस्थिती अधिकच गंभीर झाली होती. दुबईमध्ये हजारो भारतीय नागरिक अडकले होते. विमानतळ काही काळासाठी बंद करण्यात आल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. आपण सुरक्षितपणे भारतात परत येऊ शकू की नाही, अशी भीती अनेकांच्या मनात होती, असेही त्यांनी सांगितले. या संदर्भात आपण तात्काळ केंद्र सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाला ई-मेल व पत्राद्वारे माहिती दिली, मात्र त्यावर कोणताही प्रतिसाद मिळाला नाही, अशी खंत डॉ. काळे यांनी व्यक्त केली. ‘‘अशा परिस्थितीत केंद्रातील संबंधित मंत्र्यांनी पत्रकार परिषद घेऊन परदेशात अडकलेल्या भारतीय नागरिकांना धीर देणे आवश्यक होते. किती भारतीय अडकले आहेत, त्यांना परत आणण्यासाठी कोणती पावले उचलली जात आहेत, याबाबत स्पष्ट माहिती देणे गरजेचे होते,’’ असेही ते म्हणाले. दुबईतील काही ठिकाणी हॉटेल बुकिंगची मुदत संपलेल्या नागरिकांच्या निवास व खर्चाची तात्पुरती व्यवस्था तेथील प्रशासनाने केल्याची माहितीही त्यांनी दिली. विमानतळ बंद असल्यामुळे अनेक नागरिकांना काही दिवस तेथेच थांबावे लागले. साधारण तीन ते चार दिवसांनंतर हळूहळू विमानसेवा सुरू झाल्यानंतर काही भारतीय नागरिकांना परत येणे शक्य झाले. या कठीण काळात काही ओळखीच्या व्यक्तींनी स्थानिक पातळीवर मदत करण्याचा प्रयत्न केला, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, आपल्या सुखरूप परतीसाठी मतदारसंघातील नागरिकांनी केलेल्या प्रार्थना,दुवा व दिलेल्या शुभेच्छांबद्दल डॉ. कल्याण काळे यांनी कृतज्ञता व्यक्त केली. ‘‘मातृभूमीत परत आल्यानंतर एखाद्या लेकराला आईच्या कुशीत परत आल्यासारखा आनंद झाला,’’ असे भावनिक शब्द त्यांनी व्यक्त केले. या संपूर्ण घटनेच्या पार्श्वभूमीवर परदेशात अडकलेल्या भारतीय नागरिकांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकारने अधिक प्रभावी व तत्पर यंत्रणा उभारण्याची गरज असल्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच संकटाच्या काळातन परदेशातील भारतीय नागरिकांशी थेट संवाद साधण्याची व्यवस्था अधिक मजबूत करावी, असेही त्यांनी नमूद केले.यावेळी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष श्री राजाभाऊ देशमुख, , श्री जयप्रकाश दादा चव्हाण, राम सिरसाठ, सोपानराव तिरुखे,कल्याणराव तारडे, देवजी जऱ्हाड, काँग्रेस चे नगरसेवक व इतर अनेक मान्यवर उपस्थित होते.

# पंकजाताई मुंडे यांनी प्रस्तावित केलेली महत्त्वाकांक्षी ‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना’मंजूर

परळी वै.प्रतिनिधी

**राज्याच्या अर्थसंकल्पीय भाषणात ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर करण्यात आला. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी परळी वैजनाथ येथील महापशुधन एक्सपोत प्रस्तावित केलेल्या ‘मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजने’ला राज्य सरकारने मंजुरी दिली असून याबाबतची घोषणा मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात केली आहे.**

ग्रामीण भागात पशुपालन, कुक्कुटपालन, शेळीपालन तसेच इतर पशुधन आधारित उद्योगांना चालना देण्यासाठी ही योजना राबविण्यात येणार आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागातील युवक, महिला आणि शेतकरी यांना पशुधन व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक व तांत्रिक सहाय्य उपलब्ध होणार आहे. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी गती मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या नावाने सुरू असलेल्या ‘गोपीनाथ मुंडे अपघात सानुग्रह अनुदान योजने’ ची व्याप्ती वाढवून शेतमजुरांनाही या सुरक्षा कवचाखाली आणण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे अपघाती प्रसंगी शेतमजुरांच्या कुटुंबालाही आर्थिक मदत मिळणार आहे. याशिवाय महिला गोपालक, कुक्कुटपालक आणि शेळीपालक यांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष कार्यक्रम राबविण्याची घोषणा करण्यात आली आहे. पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी मांडलेल्या या उपक्रमांमुळे ग्रामीण भागात पशुधन उद्योगाला चालना मिळून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून परळी वैजनाथ येथे झालेल्या देशपातळीवरील महा पशुधन एक्स्पोच्या समारंभात पंकजाताई मुंडे यांच्या कामाचे मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले होते. तसेच येणाऱ्या काळात पंकजाताई मुंडे यांच्याकडून पशुसंवर्धन विभागाच्या ज्या ज्या योजना व प्रस्ताव दिले जातील ते सर्व मंजूर करून भरघोस निधी उपलब्ध करून देण्याचा शब्द मुख्यमंत्र्यांनी दिला होता. या अनुषंगानेच या अर्थसंकल्पात पंकजाताई मुंडे यांनी प्रस्तावित केलेली महत्त्वकांक्षी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजनेला मंजुरी देण्यात आली आहे. तसेच पशुसंवर्धन विभागासाठीही भरघोस निधी आणि प्रोत्साहनपर अनेक योजनांची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली आहे. पशुसंवर्धनातून ग्रामीण भागाची आर्थिक गती वाढविण्यासाठी घेतलेल्या या निर्णयाबद्दल ना पंकजाताई मुंडे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व सुनेत्राताई पवार यांचे आभार व्यक्त केले आहेत.

## पान १ वरून...

पान १ वरून...

### शेतकऱ्यांना २ लाखांपर्यंत कर्जमाफी !

रुपयांपर्यंत लाभ देण्यात येईल. कर्जमाफी आणि प्रोत्साहनपर योजनेसोबतच राज्यातील बँकिंग यंत्रणा सक्षम करण्यासाठी समितीच्या शिफारशीतील निकषांनुसार निर्णय घेण्यात येईल. असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सभागृहात दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील बँकांकडे सुमारे ५४.६३ लाख थकीत कर्ज खात्यांपैकी ५२.८० लाख कर्ज खात्यांची माहिती राज्य सरकारने स्थापन केलेल्या समितीसमोर सादर करण्यात आली आहे.

**केवळ मोठे आकडे अन् पोकळ घोषणा – हर्षवर्धन सपकाळ**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात केवळ मोठे आकडे व पोकळ घोषणा आहेत. सरकारने राज्यावर कर्जाचा डोंगर करून ठेवलेला असून ४० हजार कोटी रुपयांच्या तुटीचा हा अर्थसंकल्प महाराष्ट्राला दिवाळखोरीकडे घेऊन जाणारा आहे. अर्थसंकल्पात बुलेट ट्रेन, मेट्रो, भुयारी मार्गांचाच बोलबाला आहे. गाव खेड्यातला गरीब, आदिवासी, कष्टकरी, महिला, बेरोजगार व तरुणांना अर्थसंकल्पात स्थानच नाही. एकंदरीत हा अर्थसंकल्प मोजकी शहरे आणि मोजक्या लोकांसाठीच आहे. सर्वसामान्यांना यातून काहीही मिळणार नाही, अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली आहे.

------------

### २४६७ कोटींच्या मनी लॉन्ड्रिंग

की, तपास यंत्रणांनी ही कारवाई मनी लॉण्ड्रिंगच्या त्या चौकशी प्रकरणांतर्गत केली आहे, ज्याची सुरुवात महाराष्ट्राच्या विविध पोलीस स्टेशनमध्ये जुलै २०२४ मध्ये केलेल्या एफआयआरच्या आधारावर झाली होती. या एफआयआरमध्ये आरोप आहेत की, सुरेश कुटे यांनी त्यांच्या सहकाऱ्यांनी ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या माध्यमातून गुंतवणूकदारांची फसवणूक केली. सोसायटीने गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी १२ ते १४ टक्क्यांपर्यंत रिटर्न देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. तसेच यासाठी विविध योजनाही सुरु करण्यात आल्या होत्या. या योजनांच्या माध्यमातून लोकांनी मोठी गुंतवणूक केली. पण त्यानंतर गुंतवणूकदारांच्या ठेवी त्यांना अंशत: परत करण्यात आल्या, त्यामुळे त्यांचे मोठं आर्थिक नुकसान झाले. इडीच्या तपासात उघडकीस आले आहे की, सोसायटीचे जवळपास २४६७ कोटी रुपये कर्जाच्या माध्यमातून कुटे ग्रुप कंपनीला ट्रान्सफर करण्यात आले होते. या कंपन्या सुरेश कुटे आणि अर्चना कुटे यांच्या नियंत्रणात काम करतात, अशी माहिती आहे. कोणतेही अधिकृत कागदपत्रे, कोणत्याही प्रकारची सेक्युरीटी न ठेवता कुटे ग्रूपला कर्ज देण्यात आले होते. या कर्जाची रक्कम वैयक्तिक लाभ आणि अन्य व्यवसायांच्या गुंतवणुकीसाठी वापरण्यात आल्याचा आरोप तपास यंत्रणांनी केला आहे. याप्रकरणी ईडीने आधीच अर्चनाचे पती सुरेश कुटे यांना अटक केली आहे.

---------------

### इंडिया आघाडीने अजित पवारांच्या

राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या पुणे कार्यालयात भेट दिली. यावेळी त्यांनी अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यानंतर प्रसारमाध्यमांशी ते बोलत होते. राहुल गांधींच्या जवळच्या लोकांसोबत याबाबत बोलणे झाले आहे असे रोहित पवार म्हणाले. इंडिया आघाडीने हा मुद्दा लावून धरावा असेही रोहित पवार म्हणाले. सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार अपघाताच्या चौकशीसाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना भेटणार आहेत. मोठ्या पातळीवर चौकशी व्हावी यासाठी प्रयत्न करावे लागतील असे रोहित पवार म्हणाले. अपघाताबद्दल सर्वांचे मत एकच आहे. पार्थ खासदार बनल्याने त्याला काही बंधने असतील असे रोहित पवार म्हणाले. रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या अपघात प्रकरणी विविध शंका उपस्थित केल्या आहेत. हा घातपात असल्याचा संशय त्यांनी व्यक्त केला आहे. रोहित पवार यांनी या प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याची मागणी केली आहे. कागदपत्र रंगवली जाऊ शकतात तसेच, अपघातानंतर ही विमाने महाराष्ट्राबाहेर आणि देशाबाहेर जात आहेत. हैदराबादला असलेले लेगसी ६०० हे विमान आता सॅन मारिनो (युएसए) ला ट्रान्सफर करण्यात आले आहे. धंदा सुद्धा शिफ्ट करण्याचे काम तिथे सुरू झाले आहे. जर तुम्ही चोर नसालच घाबरता कशाला पण चोरच घाबरू शकतो हे आपल्या सगळ्यांना माहिती असल्याचा आरोप त्यांनी केला.

----------

### राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंध

आंतरराष्ट्रीय स्तरावरील युद्धांच्या परिस्थितीवर भाष्य करताना ते म्हणाले की, दुसऱ्याची बाजू समजून घेण्याचा प्रयत्न कोणीही करत नाही; केवळ बॉम्बफेक करणे आणि जीव घेणे एवढेच सध्या सुरू आहे. ही प्रवृत्ती लोकशाही आणि मानवी मूल्यांसाठी घातक असल्याचे त्यांनी नमूद केले. याप्रसंगी राहुल गांधी यांनी महात्मा गांधी आणि श्री नारायण गुरू यांच्या विचारांची आठवण करून दिली. हे दोन्ही महान नेते हिंसेच्या विरोधात होते आणि त्यांनी नेहमीच प्रेम, आदर, क्षमाशीलता आणि परस्पर सामंजस्याचा पुरस्कार केला होता. आजही समाज आणि राजकारण योग्य दिशेला नेण्यासाठी याच मूल्यांची नितांत गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

---------

### आरटीई प्रवेशासाठी १ किलोमीटरची

आता घरापासून फक्त १ किलोमीटरच्या आत असलेल्या शाळांपुरताच मर्यादित राहील. यापूर्वी विद्यार्थी ३ किलोमीटर आणि त्यापलीकडील शाळांमध्येही प्रवेशासाठी अर्ज करू शकत होते. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी सांगितले की २०२४ च्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार आरटीई कायद्याच्या कलम १२(१)सी अंतर्गत २५ टक्के प्रवेशांसाठी अंतराची कोणतीही अट घालता येत नाही. त्यामुळे हा नवीन नियम कायद्याच्या विरोधात असल्याचे त्यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. ७ मार्च २०२६


## थोडक्यात

### माँ नर्मदा परिक्रमा ३६०० कि.मी. पूर्तीनिमित्त डोंगरकिन्ही येथे भव्य मिरवणूक व दर्शन सोहळा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील डोंगरकिन्ही गावात माँ नर्मदा पायी परिक्रमा ३६०० कि.मी. पूर्ती निमित्त शुक्रवार, दिनांक १३ मार्च २०२६ रोजी भव्य दिव्य मिरवणूक व दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. धार्मिक उत्साहात पार पडणाऱ्या या सोहळ्यास भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८ वाजता होणार असून सकाळी ८ ते ११ या वेळेत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत पुणे येथील सुप्रसिद्ध ढोल पथक, बॅण्ड पथक, लेझीम पथक, हत्ती-घोड्यांची मिरवणूक, तसेच लातूर येथील प्रसिद्ध रांगोळी कलाकारांचे आकर्षक रांगोळी सादरीकरण पाहायला मिळणार आहे. तसेच आळंदी येथील भजनी मंडळाच्या भजन-कीर्तनाने वातावरण भक्तिमय होणार आहे. मिरवणुकीनंतर सकाळी ११ ते ११.३० या वेळेत साधुसंतांचे स्वागत करण्यात येणार असून त्यानंतर ११.३० ते १ या वेळेत साधु महात्म्यांचे मार्गदर्शन होणार आहे. कार्यक्रमाच्या शेवटी दुपारी १ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.संपूर्ण कार्यक्रमासाठी आकर्षक सजावट, अतिशबाजी तसेच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. नर्मदा परिक्रमा ही अत्यंत पवित्र आणि कठीण यात्रा मानली जाते. नर्मदा नदीच्या किनाऱ्याने सुमारे ३६०० किलोमीटरची पदयात्रा करत भक्त आत्मिक साधना, श्रद्धा आणि धैर्याची अनुभूती घेतात.डोंगरकिन्ही येथे आयोजित करण्यात आलेल्या या भव्य धार्मिक सोहळ्याला परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### आठ वर्षीय मोहम्मद साद अशरफ सय्यदचा पहिला रोजा उत्साहात


बीड । प्रतिनिधी



रमजानच्या पवित्र महिन्यात पाटोदा येथील विधीज्ञ ॲड सय्यद आशरफ यांचे चिरंजीव सय्यद मोहम्मद साद वय ८ वर्ष याने पवित्र रमजान महिन्यात आपला पहिला रोजा पूर्ण केला यावेळी नातेवाईक मित्रपरिवाराने सय्यद साद याचे कौतुक केले. मोहम्मद साद अशरफ सय्यद (वय ८ वर्षे) या चिमुकल्याने आपला पहिला रोजा श्रद्धा व उत्साहाने पूर्ण केला. लहान वयातच धार्मिक संस्कारांचे पालन करत मोहम्मद सादने संयम व शिस्तीचा सुंदर आदर्श ठेवला. त्याच्या पहिल्या रोज्यानिमित्त कुटुंबीयांनी आनंद व्यक्त करत त्याचे कौतुक केले. तसेच नातेवाईक वसीम पटेल,शेख अजीम सर, सय्यद फय्याज, शेख शाहानवाज सर, सय्यद अशरफ महेबूब व शेख अनस (पाटोदा) यांनी त्याचे अभिनंदन करून शुभेच्छांचा वर्षाव केला.

### मंत्री संजय राठोड आज बीड जिल्ह्यात

बीड । प्रतिनिधी



राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे.

दिनांक ०७ मार्च, २०२६ रोजी सकाळी १०.०० वा. सुभेदारी शासकीय विश्रामगृह, छत्रपती संभाजीनगर येथून मोटारीने काठोडा, ता. गेवराई, जि. बीड कडे प्रयाण. मार्गः- छत्रपती संभाजीनगर-पाचोड-गेवराई-काठोडा. सकाळी ११.०० वा. काठोडा येथे आगमन व संत श्री सेवालाल महाराज यांची २८७ वी जयंती उत्सवानिमित्त बंजारा महामेळावा व भव्य लेंगी स्पर्धा आणि बंजारा सांस्कृतिक कार्यक्रमास उपस्थिती. दु. १.३० वा. तीर्थक्षेत्र रामराव महाराज गड, काठोडा येथून मोटारीने यवतमाळ निवासस्थानाकडे कडे प्रयाण.

## खासदार सोनवणे, आमदार क्षीरसागर यांच्या उपस्थितीत होणार शिबिर

# महसूल सेवा थेट नागरिकांच्या दारी पोहोचविण्याचा प्रयत्न -तहसीलदार शेळके

**बीड । प्रतिनिधी**

**राज्य शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान" अंतर्गत नागरिकांच्या महसूल विषयक समस्या गावपातळीवर सोडविण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना विविध महसूल सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी दि. ७ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता श्रीकृष्ण लॉन, फाईव्ह जी हॉटेल च्या बाजूला , धुळे सोलापूर रोड येथे विशेष महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.**

या शिबिराचे अध्यक्षस्थान खासदार बजरंग सोनवणे भूषविणार असून आमदार संदीप क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे . या कार्यक्रमास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान , तसेच जिल्हा प्रशासनातील विविध अधिकारी उपस्थित राहणार आहेत.तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने या अभियानासाठी सविस्तर नियोजन केले असून नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट शिबिरातून मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे . या कार्यक्रमास जिल्ह्यातील अनेक लोकप्रतिनिधी व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत. याशिवाय प्रशासकीय पातळीवर निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके, गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप तसेच महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित राहणार आहेत . तालुका कृषी अधिकारी अशोक साळी, नायब तहसीलदार सुहास हजारे, प्रशांत जाधवर, अण्णासाहेब वंजारे, सुरेंद्र डोके, प्रशांत सुपेकर, मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे,





सहायक महसूल अधिकारी महादेव चौरे , ग्राम महसूल अधिकारी दादासाहेब शेळके यांसह विविध पदाधिकारी यांचा सहभाग राहणार आहे.

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी दिलेल्या माहितीनुसार या शिबिरामध्ये नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. त्यामध्ये डिजिटल ७/१२ आणि ८-अ उतारे, फेरफार प्रकरणांचा निपटारा, अभिलेख दुरुस्ती, विविध प्रमाणपत्रे वितरण, उत्पन्न व रहिवासी दाखले, जात प्रमाणपत्र, जमीन अभिलेख दुरुस्ती अशा सेवा दिल्या जाणार आहेत. तसेच शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांसाठी मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ते योजना, सामाजिक अर्थसहाय्य योजना, पीएम किसान योजना, कृषी विषयक मार्गदर्शन, निवडणूक विभागाकडून मतदार नोंदणी, जन्म-मृत्यू नोंद, शिधापत्रिका विषयक सेवा, आयुष्मान भारत योजना अशा विविध शासकीय योजनांची माहिती व अर्ज स्वीकृती देखील केली जाणार आहे.

तहसीलदार शेळके यांनी सांगितले की, या अभियानाचा मुख्य उद्देश म्हणजे महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख करणे आणि नागरिकांच्या प्रलंबित समस्या तात्काळ निकाली काढणे हा आहे. "कार्यालयात या" या पारंपरिक पद्धतीऐवजी "कार्यालय तुमच्या दारी" ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न या अभियानातून केला जात आहे.

शिबिरामध्ये येणाऱ्या नागरिकांनी आपापल्या कामाशी संबंधित आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, जमीन कागदपत्रे, शाळा सोडल्याचा दाखला, उत्पन्न प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रे सोबत आणावीत, असे आवाहन नायब तहसीलदार सुहास हजारे यांनी केले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन तहसील कार्यालय बीड व महसूल मंडळ पालीच्या मंडळ अधिकारी शीतल चाटे व सहकारी ग्राम महसूल अधिकारी यांच्या वतीने करण्यात आले असून कार्यक्रमाचे ठिकाण श्रीकृष्ण मंगल कार्यालय , हॉटेल फाईव्ह जी शेजारी, बीड बायपास रोड येथे निश्चित करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या लोकाभिमुख प्रशासनाच्या विचारांना अनुसरून राबविण्यात येत असलेले हे अभियान नागरिकांच्या समस्या गावपातळीवर सोडविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी शेवटी नागरिकांना आवाहन केले की, महसूल विषयक प्रलंबित कामे असलेल्या नागरिकांनी या शिबिरात उपस्थित राहून शासनाच्या लोकाभिमुख उपक्रमाचा लाभ घ्यावा.

## कुस्ती खेळ जोपासला पाहिजे -गोरख सिंघन

बीड । प्रतिनिधी

आज बीड तालुक्यातील शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या कोल्हारवाडी या गावात सालाबादप्रमाणे यंदाही गावच ग्रामदैवत काळुबा यात्रेनिमित्त गावकऱ्यांनच्या वतीने भव्य दिव्य कुस्ती आखाडा आयोजित करण्यात आला होता. या कुस्ती आखाड्यात संपूर्ण बीड जिल्हा व बाहेरील जिल्हयातील पैलवान सामील झाले होते ५० रु. पासून ते १०,००० रुपयांपर्यंत कुस्त्या लावण्यात आल्या संपूर्ण आखाडा संपेपर्यंत गावातील प्रमुख मान्यवर व युवकांनी नियोजन करण्यासाठी मेहनत घेतली.यावेळी परिसरातील व




बाहेरील आलेल्या जुन्या पैलवान, राजकीय क्षेत्रातून मान्यवर व विविध गावच्या जेष्ठ लोकांचा सत्कार करुन सन्मान करण्यात आला.गोरख अण्णांनी आपल्या मनोगतात सांगितले की, कुस्ती हा खेळ मर्दानी असुन महाराष्ट्र सरकारने हा खेळ जोपासून त्याला ताकद दिली पाहिजे, माझ्या गावातील आम्ही सर्वजण एकत्र येऊन गेल्या अनेक वर्षांपासून काळुबा यात्रेनिमित्त नवीन पैलवान त्यात व्हावेत व कुस्ती खेळ वाढावा व गावातील तरुण याकडे आकर्षित व्हावेत या उद्देशाने हे मैदान जास्तीत जास्त भव्य दिव्य व्हावे यासाठी आमचा प्रयत्न आसतो . यावर्षी संपूर्ण मराठवाड्यातील मल्लांनी या आखाड्यात हजेरी लावली व हा फड खूप भव्य दिव्य झाला त्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने सर्वांचे अभार व्यक्त करण्यात आले.शेवटी बजरंग बली की जय,शिवगिरी बाबा की , जय, छत्रपती शिवाजी महाराज की जय या घोषणा देऊन सांगता झाली.

## काशीबा महाराज पुण्यतिथी विविध धार्मिक कार्यक्रमाने साजरी



परळी । प्रतिनिधी

संत शिरोमणी काशीबा महाराज यांची पुण्यतिथी हनुमान नगर, पांढरीचा मळा, परळी वैजनाथ येथे गुरव समाजाच्या वतीने भक्तीभावात आणि उत्साह पूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या प्रारंभी संत शिरोमणी काशीबा महाराज यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन व आरती गुरव समाजातील ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी उपस्थितांनी संतांच्या कार्याचे स्मरण करत त्यांना भावपूर्ण अभिवादन केले.

पुण्यतिथीनिमित्त शुक्रवार, दि. ६ मार्च रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये भजन, कीर्तन तसेच नामस्मरण आदी कार्यक्रम भक्तिमय वातावरणात पार पडले.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संत शिरोमणी काशीबा महाराज यांच्या मंदिराचे भूमिपूजन श्रीफळ वाढवून विधिवत करण्यात आले. या प्रसंगी गुरव समाजातील महिला-पुरुष, भाविक भक्त तसेच परळी शहरातील समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर संत नामाच्या गजराने आणि भक्तिभावाने भारावून गेला होता.

दरम्यान, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परळी गुरव समाज युवक तालुका अध्यक्ष स्वप्निल (गणेश) पुजारी, राजेभाऊ अण्णा पुजारी, अनिल पुजारी, पपन पुजारी, बाळू पुजारी, सुरेश पुजारी, रमेश पुजारी, गणेश पुजारी, बालाजी पुजारी, सचिन पुजारी, निलेश पुजारी, संतोष पुजारी, बालाजी पाटील, अशोक पुजारी, आकाश पुजारी, राहुल पुजारी, प्रशांत पुजारी, शंकर पुजारी, गौरव पुजारी, वेदांत पुजारी, राम पुजारी, वैभव पुजारी, अभिषेक पुजारी, संदीप पुजारी, प्रदीप पुजारी, अरविंद पुजारी, शुभम पुजारी, सौरभ पुजारी, विजय पुजारी आदींसह गुरव समाजातील सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## ए.आय. कृषी माहिती केंद्र उभारा -प्रा.आंधळे

बीड । प्रतिनिधी

शेती क्षेत्राला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्याची वेळ आली असून प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी ए. आय. (आर्टिफेशियल इंटेलिजन्स) आधारित कृषी माहिती व मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्यात यावेत अशी मागणी ग्रामीण युवक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. बबनराव आंधळे यांनी केली आहे. या ए.आय आधारित तंत्रज्ञानामुळे कृषी कृषी माहिती केंद्रामुळे शेतकऱ्यांना हवामान अंदाज, पीक नियोजन, कीड रोग नियंत्रण, बाजार भाव सहज समजेल डिजिटल तंत्रज्ञानामुळे उत्पादन खर्चात बचत होऊन उत्पादन वाढीस चालना मिळेल. यासाठी या केंद्राची उभारणी करण्याची मागणी प्राध्यापक बबन आंधळे यांनी केली आहे.



ठिबक सिंचन योजनेचा संदर्भ देताना त्यांनी स्पष्ट केले की आतापर्यंत आपण ठिबक दिले मात्र आता शेतकऱ्यांना अनुदानित माती आद्रता हे सर्व स्मार्ट सिंचन प्रणाली देणे आवश्यक आहे सेन्सरच्या माध्यमातून पाण्याचा नेमका वापर होईल विजेची बचत होईल आणि उत्पादन क्षमता वाढेल कृषी संशोधनाबाबत बोलताना त्यांनी राहुरी आणि अकोला येथील कामाचा उल्लेख केला मात्र राज्यातील इतर कृषी विद्यापीठांमध्ये संशोधनासाठी शआवश्यक मनुष्यबळाची कमतरता असल्याचे नमूद केले नवीन वाहन विकास हवामान बदलाशी सुसंगत संशोधन आणि शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ देणाऱ्या प्रकल्पांना गती देण्यासाठी रिक्त पदे तातडीने भरावीत अशी मागणी त्यांनी विशेषतः तंत्रज्ञान स्मार्ट सिंचन आणि संशोधन बळकटी या त्रिसूत्री वर राज्याची राज्याची प्रगती अवलंबून आहे शेतकऱ्यांची प्रगती झाल्याशिवाय राहणार नाही म्हणून प्रत्येक तालुक्याला ए.आय कृषी माहिती केंद्र उभारावेत असे आव्हान ग्रामीण युवक संघटनेच्या वतीने प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे*

## ईगलवूड पॉलिटेक्निक इन्स्टिट्यूटमध्ये मुलींच्या व्हॉलीबॉल व बास्केटबॉल राज्यस्तरीय स्पर्धा यशस्वी

माजलगाव । प्रतिनिधी

येथील ईगलबुड पॉलीटेक्नीक इन्स्टिट्यूट येथे इडसा अंतर्गत आंतर विभागीय मुलींच्या व्हॉलीबॉल व बास्केटबॉल स्पर्धांचे आयोजन उत्साहात करण्यात आले.दि. २ व ३ मार्च २०२६ रोजी पार पडलेल्या या स्पर्धांमध्ये महाराष्ट्र राज्यातील विविध जिल्ह्यांतील विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे संस्थेच्या अध्यक्षा डॉ.अर्चना पवार, सचिव डॉ.शरद पवार, कोषाध्यक्ष डॉ. सुशील लोढा, पत्रकार उमेश जेथलीया, पत्रकार सुदर्शन स्वामी, प्राचार्य प्रतीक वेळापुरे, व क्रीडा शिक्षक सुलतान सर यांच्या उपस्थितीत खेळाडूंना शुभेच्छा देण्यात आल्या.



दोन दिवस चाललेल्या या क्रीडा स्पर्धांमध्ये खेळाडूंनी उत्कृष्ट संघभावना, शिस्त आणि क्रीडाभावना दाखवून प्रेक्षकांची मने जिंकली. व्हॉलीबॉल व बास्केटबॉल या दोन्ही स्पर्धांमध्ये चुरशीचे सामने रंगले.

होळी व धुलिवंदन सणांच्या पार्श्वभूमीवर स्पर्धा पार पडत असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे स्पर्धा शांततेत आणि सुरळीत वातावरणात यशस्वीरीत्या पार पडल्या. संस्थेचे प्राचार्य यांनी विजेत्या संघांचे अभिनंदन करून सर्व सहभागी खेळाडू, क्रीडा शिक्षक व आयोजन समितीचे कौतुक केले. अशा प्रकारच्या स्पर्धांमुळे विद्यार्थिनींमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि क्रीडाभावना वृद्धिंगत होण्यास मदत होते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## वधु-वर परिचय मेळाव्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान काळाची गरज -प्रा.सुशीला मोराळे

बीड । प्रतिनिधी

मातृभूमी प्रतिष्ठान संचलित, अखिल भारतीय संत भगवानबाबा वंजारी समाज वधु-वर नोंदणी महासंघ तथा वंजारी विश्व वधु-वर,वंजारी परिवार, वंजारी समाज महाराष्ट्र वार्षीक अंक छत्रपती संभाजीनगरच्या वतीने १८ वा राज्यस्तरीय सर्व शाखीय वंजारी वधु-वर परिचय मेळावा तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या गुणवंताचा राज्यस्तरीय मातृभूमी रत्न पुरस्कार गौरव सोहळा मान्यवरांच्या उपस्थित मोठ्या उत्साहाच्या वातावरणात रविवार दि.१ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता श्रीसंत भगवानबाबा सामाजिक प्रतिष्ठान येथे संपन्न झाला.

मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा. सुशीलाताई मोराळे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वासनिक प्रा.आर.टी. गर्जे,डॉ. वसंत मुंडे प्रा. ज्ञानेश्वर वाघ, ऊसतोड कामगार ज्येष्ठनेते गहिनीनाथ दादा थोरे पाटील, पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, वसुदेव मिसाळ, मंडळ अधिकारी शितल चाटे ,मोहनराव शिरसाट, उत्तमराव मिसाळ आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमात प्रारंभी मान्यवरांचे मातृभूमी प्रतिष्ठान परिवाराच्या वतीने



शाल, सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथून प्रकाशित होणारे प्रा. ज्ञानेश्वर वाघ संपादित वंजारी समाज महाराष्ट्र सातव्या वार्षिक अंकाचे तसेच उस्मानाबाद शेळी मेंढी जनक डॉ.वसंतराव मुंडे गौरव विशेषांकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. गुणवंतांचा सत्कार व वधु वर मेळाव्यात बोलताना ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या प्रा. सुशीलाताई मोराळे म्हणाल्या की बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वधुवर मेळाव्यासाठी करण्यात यावा व त्याचा लाभ राज्यातील जास्तीत वधू-वर व त्यांच्या पालकांना देण्यात यावा. युवकांनी रोजगारभिमुख कोर्स करून छोट्या छोट्या व्यवसाय व उद्योगाच्या क्षेत्रात उतरावे असे आवाहन याप्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या प्रा.सुशीलाताई मोराळे यांनी केले. यावेळी मान्यवरांनी देखील आपापले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. संजय तांदळे तर सूत्रसंचालन प्रा. बाळासाहेब नागरगोजे तर आभार गणेश सानप यांनी मानले कार्यक्रमाचे नियोजन डॉ.संजय तांदळे, प्रा.ज्ञानेश्वर वाघ, इंजि.उत्तमराव मिसाळ, प्रा.डी.जी.तांदळे, बाबा जायभाये, बाजीराव ढाकणे, पांडुरंग जायभाये, मोहनराव सिरसाट, गणेश सानप, रवींद्र मुंडे, आत्माराम वाव्हळ, हिरामण तांदळे, डॉ.लक्ष्मण पवळ, आदींनी केले कार्यक्रमास राज्यातून वधू-वर व पालक बहुसंख्येने उपस्थित होते.

**स्वामी विवेकानंद अर्बन को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी. लि. बीड**

रजि. बीएचआर/बीएचआर/आरएसआर/एसआर/४५३/२०२२

दि. २६/०२/२०२६

**विशेष सर्वसाधारण सभेची सुचना (नोटीस)**

संस्थेच्या सर्व सन्माननीय भागधारक सभासदांना कळवण्यात येते की, संस्थेच्या सभासदांची विशेष सर्वसाधारण सभा वार शनिवार दि. १४/०३/२०२६ रोजी सकाळी ठीक ११ वाजता, संस्थेचे मुख्य कार्यालय एच.पी. गॅस एजन्सी समोर, सटवाई मैदान, बीड येथे संस्थेच्या अध्यक्ष सौ. शिवकन्या अशोक राऊत यांचे अध्यक्षतेखाली संस्थेचे मुख्य कार्यालयाचे वरती सभेचे आयोजन करण्यात आले आहे. सभेत खालील विषयावर चर्चा, विचार-विनीमय करुन निर्णय घेण्यात येतील. तरी संस्थेच्या सर्व भागधारक सभासदांनी विशेष सर्वसाधारण सभेस वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

**सभेची विषय सुची**

विषय क्र. १) मागील सभेचे इतिवृत वाचन करणे व चर्चा करुन कायम करण्यास मंजुरी देणे.
विषय क्र. २) मा. सहकार आयुक्त व निंबधक सहकार विभाग पुणे यांचे पत्र २९/०७/२०२५ पतसंस्थेसाठी सुधारीत उपविधी लागु करण्यास मान्यता देणे.
विषय क्र. ३) मा. अध्यक्षांचे अनुमतीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे, मंजुरी देणे

दिनांक : १४/०३/२०२६ — **मा. संचालक मंडळाचे आदेशावरुन**
सभेचे ठिकाण : संस्थेचे कार्यालय बीड ता.जि. बीड
सभेची वेळ :-सकाळी ११ वाजता — **मुख्य कार्यकारी अधिकारी**

**सुचना :** वार्षीक सर्वसाधारण सभेस आवश्यक असलेली गणसंख्या जर सकाळी ११ वाजेपर्यंत पूर्ण झाली नाही तर ती सभा पुढे ढकलली जाईल व अशी पुढे ढकलेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी ११.३० वाजता मुळ विषय पत्रिकेवरील कामकाज पार पाडण्यासाठी घेतली जाईल. त्यासाठी गणसंख्या असणे आवश्यक राहणार नाही.

**सभासदांना नम्र सुचना**

१) सभासदांना वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे काही प्रश्न/ सुचना मांडावयाच्या असतील तर त्यांनी दि. ०८/०३/२०२६ रोजी पर्यंत कामकाजाचे वेळेत नोंदणीकत कार्यालयात लेखी स्वरुपात दयाव्यात.
२) सभेची नोटीस सभासदांचे व्हाटसअॅप क्रमांकावर पाठवण्यात आली आहे.

## पान ६ वरुन...

### आष्टी मतदारसंघात विकासाचा

हिंगेवाडी रस्ता (बोरगावजवळ) पुलाची पुनर्बांधणी, तसेच सावरगावशेडाळादेऊळगाव घाटपिंपळगाव घाटवडगाव मार्गावरील पुलाची पुनर्बांधणी अशी महत्त्वाची कामेही या निधीतून करण्यात येणार आहेत.

या कामांना लवकरच प्रत्यक्ष सुरुवात होणार असून त्यामुळे ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे. शेतमाल वाहतूक, बाजारपेठेशी संपर्क तसेच नागरिकांच्या दैनंदिन प्रवासाला मोठा दिलासा मिळणार असल्याने मतदारसंघातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. या विकासकामांना मंजुरी दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री सुमित्रा पवार,तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे आभार व्यक्त करण्यात येतं आहेत.

### कापसी येथील पोलीस पाटील

निदर्शनास आणून दिले आहे.

दरम्यान, कापसी गावातील प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांच्या आर्थिक उत्पन्नाची, जमिनीची तसेच रहिवासी पुराव्यांची सखोल चौकशी करून खोटी माहिती आढळल्यास संबंधित अर्ज बाद करून कायदेशीर कारवाई करावी, तसेच सदर जागा पात्र उमेदवारासाठी किंवा नियमानुसार पुनःआरक्षित करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी आश्रुबा नामदेव गोल्हार, बापु अंकुश गर्जे, बापु कचरू खंडागळे व यांनी केली आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार आष्टी तसेच आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनाही देण्यात आल्या आहेत.

### सातवी महाराष्ट्र

सागर लोखंडे ( सिल्वर मेडल ) सार्थक लोखंडे ( ब्रान्स मेडल ) संग्राम सावंत ( ब्रान्स मेडल ) अमर थळकरी ( ब्रान्स मेडल ) ऋषिकेश शिंदे (ब्रान्स मेडल ) अंकिता खरबड ( सिल्वर मेडल ) सार्थक लोखंडे ( ब्रान्स मेडल ) सुहासिनी लांब ( सिल्वर मेडल ) वैष्णव मडके ( ब्रान्स मेडल ) या विद्यार्थ्यांनी स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला होता या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन श्री राम नेमटे सर यांनी मार्गदर्शन केले आहे या सर्व विद्यार्थ्यांचे यश पाहून केज व परिसरातील सर्व नागरिकांतून सर्व विद्यार्थी व राम नेमके सरांचे कौतुक केले जात आहे

# इथेनॉलसाठी तांदूळ दिल्याने मका उत्पादक अडचणीत

मुंबई : केंद्र सरकारच्या धोरणानुसार १ एप्रिल २०२६ पासून पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिश्रणाचे धोरण लागू केले आहे. केंद्र शासनाच्या ४ जून २०१८ च्या जैवइंधन धोरणानुसार उसाची मळी, कृषी अवशेष, स्टार्चयुक्त पदार्थ (मका, बटाटा) तसेच मानवी खाण्यास अयोग्य नसलेले गहू, तुकडा तांदूळ या पदार्थांपासून इथेनॉलची निर्मिती केली जाते. सदर धोरणान्वये अन्नधान्याच्या अतिरिक्त उत्पादनाचा आढावा घेऊन अतिरिक्त धान्य इथेनॉल निर्मितीसाठी रूपांतर करण्याचे धोरण आहे, अशी माहिती अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी शुक्रवारी (दि. ६ मार्च) विधानसभेत लेखी उत्तरातून दिली.

इथेनॉल निर्मितीस मका ऐवजी तुकडा तांदूळ वापरला जात असल्याने मका उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत अमळनेरचे आमदार अनिल पाटील, परळीचे आमदार धनंजय मुंडे, पंढरपूरचे आमदार समाधान आवताडे यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. मक्याला हमीभावापेक्षा ३० टक्के कमी भाव मिळत असल्याचेही त्यांचे निदर्शनास आणून दिले आहे. त्यावर मंत्री भुजबळ यांनी



लेखी उत्तरातून खुलासा केला आहे. केंद्र शासनाच्या अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाच्या १ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या आदेशान्वये १ नोव्हेंबर २०२५ ते ३० जून, २०२६ या कालावधीकरीता भारतीय अन्न महामंडळ यांच्याकडे उपलब्ध असलेला अतिरिक्त तांदूळ (कमाल ५२ लाख मेट्रीक टन) इथेनॉल निर्मितीकरीता डिस्टिलरींजना विक्रीसाठी मंजुरी दिली आहे, असे भुजबळ यांनी म्हटले आहे. किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणारा मका केंद्र शासनाच्या धोरणानुसार सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत वितरीत केला जातो. या योजनेअंतर्गत इथेनॉल निर्मितीसाठी मका खरेदी केला जात नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

हमीभावाने ५ लाख ११ हजार मक्याची खरेदी

सदर योजनेंतर्गत पणन हंगाम २०२५- २६ मध्ये १६ जिल्ह्यांतील ६०,०३५ शेतकऱ्यांनी शासनाकडे मका विक्री करण्यासाठी नोंदणी केली आहे. त्यापैकी १४ जिल्ह्यांमध्ये १२,२६९ शेतकऱ्यांकडून ५ लाख ११ हजार ५३५.९ क्विंटल मक्याची प्रतिक्विंटल २,४०० रुपयांच्या हमीभावाप्रमाणे खरेदी करण्यात आली असल्याची माहिती त्यांनी दिली आहे. केंद्र शासनाकडून पहिल्यांदा ६ लाख ६० हजार क्विंटल मका खरेदीचे उदिष्ट प्राप्त झाले होते. त्यानंतर केंद्र शासनाकडून अतिरीक्त ५ लाख क्विंटल मका खरेदीचे उदिष्ट प्राप्त झाले. यासाठी खरेदीची अंतिम मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत वाढविण्यात आल्याने मका खरेदी वाढणार असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१७७१ : हैदर आणि मराठे यांच्यात प्रसिध्द अशी मोती तलावाची लढाई झाली.
१८७६ : अलेक्झांडर ग्रॅहॅम बेल याला टेलिफोनचे पेटंट मिळाले.
१९३६ : दुसरे महायुद्ध व्हर्सायचा तह धुडकावून जर्मनीने र्‍हाईनलँडमधे सैन्य घुसवले.
१९८३ : नवी दिल्ली येथे सातव्या अलिप्त राष्ट्रपरिषदेस आजच्याच दिवशी सुरुवात झाली.
२००६ : लष्कर-ए-तैय्यबा या आतंकवादी संघटनेने वाराणसी येथे बॉम्बस्फोट घडवून आणले.
२००९ : केपलर स्पेस ऑब्झर्व्हेटरी या संशोधन संस्थेची स्थापना.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५०८ : हुमायून दुसरा मुघल सम्राट (मृत्यू: १७ जानेवारी १५५६)
१७६५ : फोटोग्राफी चे शोधक निसेफोरे नाएप्से यांचा जन्म. (मृत्यू: ५ जुलै १८३३)
१७९२ : सर जॉन विल्यम हर्षेल ब्रिटिश गणितज्ञ आणि खगोलशास्त्रज्ञ, रॉयल ॲस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचा संस्थापक (मृत्यू: ११ मे १८७१)
१८४९ : ल्यूथर बरबँक महान वनस्पतीतज्ञ (मृत्यू: ११ एप्रिल १९२६)
१९११ : सच्चिदानंद हिरानंद वात्स्यायन तथा 'अज्ञेय' ज्ञानपीठ पारितोषिक (१९७८) व साहित्य अकादमी पुरस्कार (१९६४) विजेते हिन्दी लेखक व वृत्तपत्रकार (मृत्यू: ४ एप्रिल १९८७ नवी दिल्ली)
१९१८ : मराठी साहित्यिक स्नेहलता दत्तात्रय दसनूरकर यांचा जन्म.
१९३४ : नरी कॉन्ट्रॅक्टर भारताचा यष्टिरक्षक
१९४२ : उमेश कुलकर्णी, भारतीय क्रिकेट खेळाडू.
१९५२ : सर विवियन रिचर्ड्स वेस्ट इंडिजचे क्रिकेटपटू
१९५५ : अनुपम खेर चित्रपट अभिनेता

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६४७ : दादोजी कोंडदेव छत्रपती शिवाजी महाराजांचे गुरू (जन्म: १५७७)
१९२२ : गणपतराव जोशी रंगभूमीवरील असामान्य अभिनेते, शेक्सपियरच्या नाटकांतील त्यांच्या भूमिका अतिशय गाजल्या होत्या (जन्म: १५ ऑगस्ट १८६७)
१९५२ : परमहंस योगानंद, भारतीय तत्त्वज्ञ.
१९५७ : मागासवर्गीयांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी कुमाँऊ परिषदेची स्थापना केली. (जन्म: १० सप्टेंबर १८८७)
१९६१ : गोविंद वल्लभ पंत स्वातंत्र्यसैनिक, भारताचे चौथे गृहमंत्री व उत्तर प्रदेशचे पहिले मुख्यमंत्री, भारताचे पहाडी पुरूष, प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष, भारतरत्न
१९७४ : माजी अर्थमंत्री टी. टी. कृष्णमाचारी यांचे निधन.
१९९३ : इझ्रा मीर माहितीपट निर्मितीचे आद्य प्रवर्तक (जन्म: २६ आक्टोबर १९००)
२००० : प्रभाकर तामणे साहित्यिक व पटकथालेखक (जन्म: २९ आक्टोबर १९३१)
२०१२ : रवि शंकर शर्मा ऊर्फ 'रवि' संगीतकार (जन्म: ३ मार्च १९२६)
२०१५ : भारतीय वकील आणि राजकारणी जी. कार्तिकेयन यांचे निधन. (जन्म: २० जानेवारी १९४९)

# अझोला शेती करण्याची पद्धत व त्याचे फायदे

अझोला, एक अद्भुत जलचर फर्न वनस्पती आहे, ती पाण्याच्या पृष्ठभागावर वेगाने वाढते. शेतकऱ्यांना, मर्यादित स्त्रोतांमुळे, अनेकदा जनावरांसाठी पुरेसे खाद्य तयार करण्यासाठी संघर्ष करावे लागतात त्यांच्यासमोर अझोला हा योग्य पर्याय आहे. अझोला हे गुरेढोरे, मासे, डुक्कर आणि कुक्कुटपालनासाठी एक आदर्श शाश्वत खाद्य आहे. याशिवाय, ते शेतात जैव खत म्हणून देखील वापरले जाते. त्यामुळे अनेक शेतकरी अझोला लागवडीकडे आकर्षित होत आहेत. अझोला लागवड चीन, व्हिएतनाम आणि फिलीपिन्स इत्यादी देशांमध्ये लोकप्रिय आहे. अझोला नायट्रोजन स्थिर करण्यात मदत करते, अजोला हा नायट्रोजनचा उत्कृष्ट स्रोत आणि उच्च पोषक मूल्य आहे. अझोला लागवडीसाठी कमी गुंतवणूक आवश्यक आहे; त्यामुळे चांगल्या खाद्यासाठी आणि चांगल्या जैव खतासाठी हा कमी खर्चाचा पर्याय उपलब्ध आहे.

अझोलाचे फायदे :अझोलामध्ये खूप जास्त प्रथिने, अमीनो ॲसिड, जीवनसत्त्वे (व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी १२, बीटा कॅरोटीन) आणि खनिजे असतात, म्हणून हे पशुधनासाठी एक उत्कृष्ट पोषक आहार आहे. तसेच अझोलामध्ये लिग्निनचे प्रमाण कमी असते. त्यामुळे प्राणी अजोला सहज पचतात. पोल्ट्री पक्षांना अझोला खायला दिल्याने ब्रॉयलर कोंबडीचे वजन सुधारते आणि थर असलेल्या पक्ष्यांच्या अंडी उत्पादनात वाढ होते. जनावरांमध्ये, १.५-२ किलो अझोला नियमित खाद्यासोबत एकत्रित केल्यावर एकूण दूध उत्पादनात १५-२०% वाढ दिसून आली.

तण नियंत्रण :अझोला वनस्पती पाण्याच्या पृष्ठभागावर जाड थर तयार करू शकते, म्हणून ते भातशेतीमध्ये तण नियंत्रणासाठी याचा वापर करतात. भातशेतीमध्ये, अझोला एक जाड थर तयार करतो आणि सर्व शेत क्षेत्र व्यापतो आणि सेंद्रिय मल्चिंग म्हणून काम करतो, ज्यामुळे तण तयार होऊ देत नाही. तसेच, यामुळे पाण्याच्या बाष्पीभवनाचा वेग कमी होतो आणि जमिनीतील ओलावा दीर्घकाळ टिकतो.

डास नियंत्रण : अझोलामध्ये आणखी एक क्षमता आहे. अझोला डासांच्या प्रजननाच्या प्रक्रियेला प्रतिबंधित करते आणि म्हणूनच अझोलाला ''मच्छर फर्न'' असेही म्हणतात.



# ठिबक अनुदान गैरव्यवहार : २ कृषी अधिकारी निलंबित, ३ दुकानदार काळ्या यादीत



पुणे : जुन्नर तालुक्यातील बेल्हे कृषी मंडळांत ठिबक सिंचनासाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात गैरव्यवहार झाला असून, याप्रकरणी दोन कृषी अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी यांच्या कार्यालयातून समोर आली आहे.

उपविभागीय कृषी अधिकारी सतीश शिरसाठ यांनी ठिबक संचासाठी आलेल्या ४६१ प्रस्तावांची पडताळणी केल्यानंतर त्यात ३४८ प्रस्ताव बनावट असल्याचे आढळले. त्यानंतर या प्रस्तावांचे अनुदान वेळीच रोखल्याने राज्य सरकारचे २ कोटी ८६ लाख वाचले आहेत. तर १५ बनावट शेतकऱ्यांना देण्यात आलेले ५ लाख ८८ हजार वसूल करण्यात आले. यात तीन दुकानदारांना काळ्या यादीत टाकण्यात आले आहेत. पंतप्रधान आणि मुख्यमंत्री सूक्ष्म सिंचन योजनेत ठिबक संचासाठी अनुदान देण्यात येते. त्यासाठी पात्र शेतकऱ्यांकडून अर्ज मागविले जातात. त्यानुसार बेल्हे कृषी मंडळात ४६१ प्रस्ताव आले होते. मात्र, शिरसाठ यांना नियमित तपासणीत संशय आल्याने त्यांनी या प्रस्तावांची छाननी करण्याचे आदेश दिले. त्यासाठी चार पथकांची स्थापना करण्यात आली. या तपासणीत ३४८ प्रस्ताव बनावट होते.

त्यामध्ये बनावट देयके, फोटो, तपासणी अहवाल संकेतस्थळावर अपलोड केले होते. १०३ प्रस्ताव योग्य आढळले तर १० प्रस्तावांची अनुदानाची गणती चुकलेली आढळली. या एकूण ३४८ बनावट प्रस्तावांसाठी २ कोटी ८६ लाखांचे अनुदान देण्यात येणार होते. १५ प्रस्तावांचे ठिबक संचाचे ५ लाख ८८ हजारांचे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाले होते. त्याच्या वसुलीचे आदेश शिरसाट यांनी दिल्यानंतर ही रक्कम परत मिळाली आहे. उर्वरित ३३३ प्रस्तावाचे २ कोटी ८१ लाखांच्या अनुदानाचे वितरण झाले नव्हते. हे प्रस्ताव महाडीबीटी पोर्टलवरून काढून टाकण्याचा प्रस्ताव कृषी आयुक्तालयाकडे देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. या प्रकरणी बनावट बिले देणे, कार्यालयास नोटिशीचे उत्तर न देणे यासाठी तुळजाई इरिगेशन बोरी बुद्रुक, ओम साई ॲग्रो एजन्सी बेल्हे, श्रीनाथ इरिगेशन बेल्हे या तीन दुकानदारांची नोंदणी कायमस्वरूपी रद्द करण्यात आली आहे.

# शेळ्यांचे जंत निर्मुलन व आरोग्य व्यवस्थापन



शेळीला गरीबाची गाय असे संबोधले जाते. शेळी ही रोगाला फारशी बळी पडत नाही, परंतु विशेषतः पावसाळ्यात शेळीची विशेष काळजी घ्यावी लागते. त्याकरिता वेळेवर लसीकरण करणे, नियमित जंत निर्मुलन, गोठ्याची स्वच्छता, गव्हाणीचा वापर या बाबींचा आरोग्यावर निश्चित परिणाम होतो.

शेळ्यांच्या जंतनिर्मुलनासाठी जंतनाशकाचा वापर : शेळ्यांची सदृढ पचनसंस्था व आरोग्यासाठी जंत निर्मुलन करून घेऊन खालीलप्रमाणे जंतनाशक औषधांचा वापर करावा. करडांच्या वयाच्या २० ते ३० दिवसापासून जंतनाशक औषधे देता येतात.

जानेवारी व जुलै - अल्बेन्डाझॉल १० मि.ग्रॅ. प्रति किलो वजनाप्रमाणे चपटेकृमी व गोलकृमी जंतांच्या निर्मुलनासाठी वापरावे. एप्रिल व ऑक्टोबर - डोस्टोडीन किंवा झोनील पैकी कोणतेही एक औषध यकृत कृमीच्या निर्मुलनासाठी १० मि.ग्रॅ. प्रतिकिलो वजनाप्रमाणे वापरावे.


लाळयाखुरकत : हा विषाणूजन्य रोग आहे. या रोगाच्या प्रमुख लक्षणामध्ये शेळ्यांच्या जिभेवर तोंडात, पायात, कासेवर आणि तोंडाच्या आतील भागावार फोड येतात. तोंडातून जास्त प्रमाणात लाळ पडते.

उपचार व प्रतिबंध : या रोगामुळे शेळ्यांचे खाणे-पिणे कमी होते. त्यामुळे शेळ्या कमजोर होतात. त्याकरिता त्यांना पाण्यातून जीवनसत्त्वे द्यावेत. जिभेचे फोड अन्टीसेप्टीक औषध लावून धुवावे. प्रतिबंधात्मक उपचाराकरिता वर्षातून दोन वेळा लस टोचून घ्यावे. वरीलप्रमाणे शेळ्यांचे व्यवस्थापन केल्यास शेतकऱ्यांना शेळीपालन एक किफायतशीर व्यवसाय फायद्याचा ठरेल व शेळीपालकांचा आर्थिक स्तर उंचावेल.

# मिरची रोपांची फसवणूक टाळण्यासाठी अशी घ्या काळजी

मिरची हे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे प्रमुख नगदी पीक आहे, विशेषतः मराठवाडा, नागपूर आणि सोलापूर परिसरात याची लागवड मोठ्या प्रमाणात होते. मात्र, मागील काही वर्षांपासून मिरचीच्या रोपांबाबत फसवणूक, चुकीच्या जाती आणि कमी दर्जाची रोपे यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. दर्जेदार आणि रोगमुक्त रोपांची निवड ही यशस्वी लागवडीसाठी पहिली आणि सर्वात महत्त्वाची पायरी आहे. या लेखात मिरची रोपे निवडताना कोणती काळजी घ्यावी, याबाबत सविस्तर मार्गदर्शन दिले आहे, जेणेकरून शेतकरी फसवणुकीपासून वाचतील आणि सुदृढ पीक घेता येईल.

विश्वासार्ह नर्सरीची निवड : मिरची रोपे खरेदी करताना नेहमी नावाजलेल्या आणि विश्वासार्ह नर्सरीला प्राधान्य द्यावे. मराठवाड्यातील भोकरदन, जालना, सिल्लोड, फुलंब्री, अजंठा किंवा नागपूर, सोलापूर परिसरातील शेतकरी स्थानिक पातळीवर चांगल्या नर्सरींची माहिती घेऊ शकतात. अनुभवी शेतकरी, कृषी तज्ज्ञ किंवा स्थानिक कृषी केंद्र यांचा सल्ला घ्यावा. नर्सरीने रोपांच्या जातीबाबत स्पष्ट माहिती, प्रमाणपत्र आणि रोगमुक्तीची हमी द्यावी. जर नर्सरी संशयास्पद वाटत असेल किंवा माहिती अपुरी असेल, तर तिथून रोपे खरेदी करणे टाळावे. नर्सरीत स्वच्छता राखली गेली आहे का, रोपे योग्य अंतरावर लावलेली आहेत का, आणि पाण्याचा निचरा व्यवस्थित होतो का, याची



पडताळणी करावी. अस्वच्छ नर्सरीतून रोगग्रस्त रोपे मिळण्याची शक्यता जास्त असते.

रोपांची बाह्य तपासणी : पाने - रोपांची पाने हिरवी, टवटवीत, चकचकीत आणि रोगमुक्त असावीत. पानांवर पिवळेपणा, कुरकुरणे, मोजॅक पॅटर्न (पानांवर ठिपके किंवा विचित्र रचना), पांढरे किंवा राखाडी डाग किंवा पांढऱ्या माशीची लक्षणे दिसल्यास ती रोपे नाकारावी. पानांच्या खालच्या बाजूस लहान पांढरे कीटक (पांढरी माशी) दिसल्यास ती रोपे व्हायरसग्रस्त असण्याची शक्यता आहे.

खोड - रोपांचे खोड मजबूत, सरळ आणि हिरवे असावे. खोड पातळ, कमकुवत, तपकिरी किंवा काळवंडलेले असल्यास ती रोपे कमी दर्जाची असू शकतात. खोडावर कोणतेही डाग किंवा जखमा नसाव्यात.

मुळे - मुळे पांढरी, निरोगी आणि चांगली वाढलेली असावी. मुळे पिवळ्या, कुजलेल्या, काळ्या किंवा कमकुवत असल्यास ती रोपे निवडू नयेत. मुळांची लांबी आणि घनता तपासावी; निरोगी मुळे दाट आणि मजबूत असतात. रोपांचा एकूण आकार एकसमान असावा. खूप लहान किंवा खूप मोठी रोपे टाळावी, कारण त्यांचा जमिनीत स्थिर होण्याचा दर कमी असतो.

जातीची खात्री - रोपे खरेदी करताना नर्सरीकडून जातीचे नाव, वैशिष्ट्ये आणि उत्पादनक्षमता याबाबत लेखी माहिती घ्यावी. उदा., मराठवाड्यात 'एडवांटा गोल्डन -४७', 'नन्हेम्स आर्मर', 'राशी सोनल' किंवा 'पुसा ज्वाला' या जाती लोकप्रिय आहेत, तर नागपूरात 'सिमीन्स सितारा गोल्ड' आणि सोलापूरात 'टीम सीड शक्ती' यांना मागणी आहे. चुकीच्या जातीची रोपे मिळू नयेत म्हणून शक्यतो स्थानिक बाजरपेठेची मागणी आणि हवामानानुसार योग्य जाती निवडावी. नर्सरीने जातीबाबत अस्पष्ट माहिती दिल्यास किंवा प्रमाणपत्र नसल्यास तिथून रोपे घेणे टाळावे. स्थानिक कृषी केंद्र, कृषी विद्यापीठ किंवा अनुभवी शेतकऱ्यांचा सल्ला घेऊन जातीची खात्री करावी.

रोपांचे वय आणि आकार : लागवडीसाठी २५-३० दिवसांची रोपे आदर्श मानली जातात. या वयात रोपे साधारण ६-८ इंच उंच, ४-६ पानांसह आणि मजबूत खोडासह असावीत. खूप लहान (१५-२० दिवसांची) रोपे कमकुवत असतात, तर खूप मोठी (४०-५० दिवसांची) रोपे जमिनीत स्थिर होण्यास वेळ लागतो. योग्य वयाची रोपे निवडावी. नर्सरीत रोपे जास्त काळ ठेवलेली नसावी, कारण अशी रोपे कमकुवत होऊ शकतात. नर्सरीकडून रोपांचे वय आणि तयारीची तारीख विचारावी.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# एकच प्लॉट दोघांना विक्री केल्याप्रकरणी विनयकुमार कोठारीसह मुलाविरुद्ध गुन्हा दाखल

## लेआउट मंजूर नसतानाही केला चुकीचा व्यवहार

जालना । प्रतिनिधी

जालना शहरातील विनयकुमार कोठारी व मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. कुठलाही अकृषक परवाना नसताना तसेच नगर भुमापन कार्यालय किंवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून लेआऊटचा कुठलाही नकाशा मंजूर झालेला नसताना बनावट नकाशाच्या माध्यमातून प्लॉट विक्री करीत ग्राहकाची लाखोची फासवणुक करणाऱ्या कोठारी पिता-पुत्राविरुध्द सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याविषयी प्रतिष्ठीत व्यापारी महेश सत्यनारायण चेचाणी रा. माणक रतननगर, जालना) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आपण विनयकुमार रिखबचंद कोठारी आणि प्रसन्नाकुमार विनयकुमार कोठारी (दोघे रा. भरतनगर, जालना) यांच्याकडून दि. ७ डिसेंबर २०२१ ते ५ एप्रिल २०२२ या काळात नवीन मोंढा देऊळगाव राजा रोडवरील सर्वे नं. १८३ मधील एक सहान प्लॉट १५ लाख रुपयात खरेदी केला होता. तत्पूर्वी हा प्लॉट असलेला लेआऊट जिल्हाधिकारी कार्यालयाकडून निवासी वापरासाठी मंजूर असल्याचे तसेच अंतिम लेआऊट पास असल्याचे कोठारी पिता-पुत्रांनी आपणास सांगितले होते. या दोघांशी असलेली जुनी ओळख आणि वकिलामार्फत मिळालेल्या क्लिअर टायटल सर्च रिपोर्टवर विश्वास ठेवून आपण एप्रिल २०२२ मध्ये १५ लाख रुपये देऊन

प्लॉटचे रितसर खरेदी खत करुन घेतले, असे नमूद करून चेचाणी यांनी पुढे म्हटले आहे की, बांधकाम सुरू करण्याच्या उद्देशाने दि. २५ जानेवारी २०२६ रोजी आपण या प्लॉटवर गेलो असता तेथे शिवाजी किंगरे नावाच्या व्यक्तीने या जागेवर आपला हक्क सांगितला. आम्ही तपास केला असता कोठारी पिता-पुत्रांनी हा प्लॉट सन २००८ मध्येच संगीता किंगरे आणि प्रल्हादराव घोंगे यांना विक्री केल्याचे निदर्शनास आले. धक्कादायक बाच म्हणजे, या प्लॉटवाबत आमच्याशी आणि किंगरे-घोंगे यांच्याशी व्यवहाराच्या दोन्ही खरेदीखतांमध्ये चत्? सीमा बदलून, भूखंड क्रमांक न टाकता अंधारात ठेवण्यात आले, असे नमुद करून श्री. चेचाणी यांनी आपल्या फिर्यादीत पुढे म्हटले आहे की, आम्ही अधिक चौकशी केली असता कोठारी पिता-पुत्रांनी या जमिनीचा कोणताही अंतिम अकृषक परवाना किंवा अधिकृत नकाशा मंजूर नसताना, खाजगी व्यक्तीकडून बनावट नकाशे तयार करून प्लॉट विक्री सुरु केली होती. या बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची तसेच आमच्यासारख्या अनेक निष्पाप प्लॉटधारकांची फसवणूक केली. दरम्यान, आपण या फसवणुकीबाबत विधारणा करण्यासाठी गेलो असता आमचे कोणीही काहीही वाकडे करू शकत नाही, तुम्हाला काय करायचे ते करा, अशी उत्तरे देत कोठारी पिता-पुत्रांनी आम्हाला शिवीगाळ केली. तसेच आमच्यावर दबाव टाकण्यासाठी त्यांनी उलट आमच्याविरुध्दच खोटी तक्रार दाखल केली, असे श्री. चेचाणी यांनी आपल्या फिर्यादीत म्हटले आहे, याप्रकरणी कोठारी पिता-पुत्राविरुध्द सदर बाजार पोलीस ठाण्यात भादंवि कलम ४१७, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ५०४, ५०६ आणि ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून, या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरिक्षक आनंदसिंग साबळे हे करीत आहेत.

# जानकी महोत्सव व मिनी सरस विक्री प्रदर्शनाचे आयोजन

## नागरिकांनी लाभ घ्यावा-मिन्नू पी. एम.

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत ग्रामीण स्वयं सहाय्यता समूहांमार्फत तयार करण्यात आलेल्या विविध उत्पादनांच्या विक्रीस प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरीय ''जानकी महोत्सव २०२६'' व मिनी सरस विक्री प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. सदर प्रदर्शन दि. ०७ मार्च २०२६ ते दि. ११ मार्च २०२६ या कालावधीत डॉ. फ्रेजर बॉईज हायस्कूल, आझाद मैदान समोर, जालना येथे भरविण्यात येणार आहे.


या प्रदर्शनामध्ये जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागातील स्वयं सहाय्यता समूहातील महिलांनी तयार केलेल्या विविध प्रकारच्या गुणवत्तापूर्ण व घरगुती उत्पादनांचे एकूण ८० स्टॉल्स उभारण्यात येणार असून, नागरिकांना ग्रामीण भागातील दर्जेदार उत्पादने खरेदी करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.या स्टॉल्समध्ये गावठी पद्धतीने तयार केलेले मसाले, हळद, मिरची पावडर, पापड, खारोडी, धपाटे पीठ, ढोकळा पीठ, विविध डाळी, बाटी पीठ, विविध फरसाण, गावठी तूप, ॲपल जॅम, मध, गोड पदार्थ, घोंगडी, योगा मॅट, पत्रावळी, लाकडी



खेळणी आदी विविध उत्पादने विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहेत.याशिवाय ग्रामीण भागातील अस्सल चविष्ट शाकाहारी व मांसाहारी जेवण, तसेच दहीधपाटे, झुणका-भाकर, भरीत-भाकरी, मिसळ, वडापाव अशा विविध खाद्यपदार्थांची चवही नागरिकांना चाखता येणार आहे. ग्रामीण महिला बचत गटांनी तयार केलेल्या या उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी जालना जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खरेदी करावी व महिलांच्या उद्यमशीलतेला पाठबळ द्यावे, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांनी केले आहे.

# यशस्वी उद्योजक होण्यासाठी कठोर परिश्रम घेण्याची आवश्यकता: प्राचार्य डॉ. सानप

## मॉर्डन महाविद्यालयात नवउदयोजक प्रशिक्षणास प्रारंभ



छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

कोणताही उद्योग, व्यवसाय रातोरात उभा राहत नाही. यशस्वी उद्योगांच्या, व्यवसायांच्या आणि उद्योजकांच्या मागे अनेक वर्षाचे कठोर परिश्रम आणि अनुभव दडलेले असतात हे लक्षात घेऊन युवकांनी यशस्वी उद्योजक , व्यवसायीक होण्यासाठी आत्मविश्वासाने कठोर परिश्रम घेण्याची गरज आहे. संयमाची आवश्यकता आहे. वर्तमानाची गरज लक्षात घेऊन नवउद्योजकांनी आपल्या व्यवसाय, उद्योगाला नाविन्याची व गुणवत्तेची जोड दिली पाहिजे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.नामदेव सानप यांनी व्यक्त केले.

छत्रपती संभाजीनगर येथील मॉर्डन महाविद्यालयात महाराष्ट्र उद्योजक विकास केंद्र आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षणासाठी निवड करण्यात आलेल्या तीस प्रशिक्षणार्थींचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राचार्य डॉ. सानप हे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर एम सी ई डी चे प्रशिक्षण समन्वयक रितेश साळवे प्रा.संतोष प्रधान यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. सानप म्हणाले की, शासनाच्या विविध उद्योजकता विकास योजनेचा लाभ घेऊन महाराष्ट्र उद्योजक विकास केंद्र आणि बार्टी संस्थेच्या सहाय्याने युवकांनी ध्येयाने उद्योग ,व्यवसाय उभारण्याची आवश्यकता आहे .यावेळी एमसीईडीचे प्रशिक्षण समन्वयक रितेश साळवे म्हणाले की, उद्योजक प्रशिक्षणार्थींनी आपले प्रशिक्षण यशस्वी करून उद्योजक कौशल्य आत्मसात करून उद्योग व्यवसायास प्रारंभ करावा. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्रा. हर्षल वाघमारे यांनी केले तर शेवटी आभार प्रा. राजेंद्र भगत यांनी मानले यावेळी अनेक प्रशिक्षणार्थीने आपले मनोगत व्यक्त केले.

# भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांचे बेमुदत काम बंद आंदोलन

जालना । प्रतिनिधी

तांत्रिक वेतनश्रेणी लागू करावी, मोजणी कर्मचाऱ्यांना निश्चित प्रवास भत्ता ठरवून तो वेतनामध्ये समाविष्ट करावा, यासह विविध मागण्यांसाठी भूमी अभिलेख कर्मचारी कृती समितीकडून गेल्या १५ दिवसांपासून संप पुकारण्यात आला आहे. या संपात जालना जिल्ह्यातील १०४ कर्मचारी सहभागी झाले असून, जमीन मोजणी, फेरफार, वारस नोंदणीची २० टक्के कामे ठप्प झाली आहेत. कर्मचाऱ्यांनी बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून शासनाचा निषेध केला. भूमी अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांसाठी आजपर्यंत सनदशीर मार्गाने लढा उभारला आहे. वारंवार मागणी करूनही शासन तांत्रिक वेतनश्रेणी लागू करत नाही, यासाठी १८ फेब्रुवारीपासून भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. धरणे आंदोलनात या कर्मचाऱ्यांनी घेतला




सहभाग या आंदोलनात एफ. ई. रोडसमुद्रे, वंदना मोकासे, दीपक राऊत, रणजित गुसिंगे, अतुल जोशी, विशाल कावरे, विलास राऊत, अनिल खंदारकर, गणेश लोंढे, विक्रम बनसोडे, राजेंद्रकुमार बावस्कर, प्रवीण बनसोडे, अनिता गवई, कोमल शिमरे, उषा भालेराव, कपिल अहिरराव, विजय वानखेडे, संजय मिसाळ, विनोद बसय्ये, के. जी. कोलते, अनिल माळी, आर. एस. अंभोरे आदींनी सहभाग जिल्ह्यात भूमी अभिलेख कार्यालयात जवळपास १३२ कर्मचारी आहेत. त्यापैकी १०४ जण संपावर आहेत. त्यामुळे ९० टक्के कामे ठप्प झाली आहेत. यावर वरिष्ठस्तरावरून तोडगा काढण्याचे काम सुरू आहे. अशी माहिती प्राप्त झाली आहे.

# भाची सुनेवर अत्याचार केल्याप्रकरणी जन्मठेप

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

गर्भवती अल्पवयीन भाची सुनेवर बलात्कार केल्याप्रकरणी मामे सासरा व त्याच्या मेहुण्यास २० वर्षांची जन्मठेप व ३७ हजार रुपये दंडाची शिक्षा जिल्हा न्यायाधीश श्रीमती आर. डी. खेडेकर यांनी सुनावली. पीडिता व आरोपी हे देवगाव रंगारी पोलिस ठाणे हद्दीतील दोन गावचे रहिवासी आहेत. १४ ऑक्टोबर २०२३ रोजीची घटना आहे.

फिर्यादीनुसार, पीडिता ही घटनेच्या दिवशी १७ वर्षे ९ महिन्यांची होती. तिचे लग्न २०२२ मध्ये समाजाच्या रीतिरिवाजाप्रमाणे झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे. घटनेदिवशी सकाळी पीडितेचा पती व सासरा हे मोसंबी तोडण्याच्या कामाला गेले होते. घरात पीडिता व तिची सासू या दोघीच होत्या. पीडितेची सासू मानसिक रुग्ण असून, तिला पाहण्यासाठी तिचा भाऊ तथा आरोपी व त्याचा मेहुणा असलेला दुसरा आरोपी आलेले होते. पीडितेच्या मामे सासऱ्याने त्याच्या बहिणीला म्हणजे पीडितेच्या सासूला काही तरी सांगून घराबाहेर पाठवून दिले व अत्याचार केला. त्याच्यानंतर सोबतच्या त्याच्या मेहुण्यानेही अत्याचार केला. यावेळी आपण गर्भवती असल्याचे सांगूनही त्यांनी अत्याचार करताना मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी देवगाव रंगारी पोलिस ठाण्यात आरोपींविरुद्ध पोक्सो कायद्यासह बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा पोलिस उपविभागीय अधिकारी श्रीमती स्वामी यांनी तपास केला. प्रभारी अधिकारी म्हणून पोलिस ठाण्याचे संदीप राजपूत यांनी काम पाहिले. सरकारी अभियोक्ता सुजाता देशमुख-पाठक यांनी चार साक्षीदार तपासले. पैरवी अधिकारी म्हणून संजय धुमाळ यांनी तर कोर्ट पैरवी अधिकारी म्हणून विद्या हिरालाल चव्हाण, श्रीमती व्ही. जी. कबाडे यांनी काम पाहिले.

# एमआयएमच्या १४ नगरसेवकांच्या पदावर टांगती तलवार

छत्रपती संभाजीनगर

शहागंज परिसरातील अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईदरम्यान अडथळा आणल्याच्या प्रकरणात एमआयएमच्या १४ नगरसेवकांवर मनपा कायद्यानुसार पद रद्द करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती महापालिका आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिली. या प्रकरणात नगरसेवकांसह त्यांच्या नातेवाईक व कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास प्रक्रिया सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितले की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १०-अ नुसार नगरसेवक शपथपत्रात कायद्याचे पालन करण्याची जबाबदारी स्वीकारतात. कायद्याचे उल्लंघन झाल्यास पदमुक्त होण्याची तरतूद आहे. त्यानुसार शहागंज येथील अतिक्रमण कारवाईदरम्यान काही नगरसेवक व त्यांच्या कार्यकर्त्यांनी अडथळा आणल्याची नोंद झाल्याने कलम १०, ११ आणि १२ अंतर्गत सुमारे ४० जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये नगरसेवकांसह त्यांचे भाऊ, पुत्र आणि इतर नातेवाइकांचा समावेश असल्याची माहिती देत पोलिसांकडून व्हिडिओ पुराव्यांच्या आधारे तपास सुरू असल्याचे आयुक्तांनी सांगितले. दरम्यान, विरोधी पक्षनेते समीर साजेद यांनी हा गुन्हा बनावट असल्याचा आरोप केला. तसेच शिंदे सेनेच्या दवावाखाली हा गुन्हा दाखल करण्यात आल्याचा दावाही समीर साजेद यांनी केला. शहागंज घटनेपूर्वी आपण आयुक्तांशी चर्चा करूनच तेथे गेलो होतो, मात्र त्या वेळी अतिक्रमण कारवाई सुरू नव्हती, असेही त्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणामुळे शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, पुढील निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शहागंज येथील हातगाडी कारवाईवेळी अधिकाऱ्याला जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप विरोधी पक्षनेता समीर साजेद यांनी फेटाळून लावला आहे. तसेच यावर जर असा व्हिडिओ दाखवला तर मी राजकारणातून संन्यास घेईन, असे आव्हानही साजेद यांनी दिले आहे.

# कला साहित्य क्रीडा प्रशासकीय अधिकारी बनण्याचे व्यासपीठ म्हणून पार्थची ओळख-डॉ.महावीर सिंग चौहान

पाथर्डी । प्रतिनिधी

शुद्ध आचरण निर्व्यसनीपणा जिद्द व परिश्रमाची तयारी ठेवणारा विद्यार्थीच यशाची शिखरे पादाक्रांत करतो चटकन आकर्षण ठरणाऱ्या मौजमजेचे क्षण टाळून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन जीवनाच्या पुढील दहा वर्षाचा विचार करून वाटचाल ठरवावी असे मत ज्येष्ठ साहित्य तथा महात्मा फुले कृषी विद्यापीठ विद्यार्थी कल्याण अधिकारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक प्रा.डॉ.महावीर सिंग चौहान यांनी व्यक्त केले बाबूजी आव्हाड महाविद्यालयात आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी त्यांनी विद्यार्थी व उपस्थितांबरोबर संवाद साधला.

अत्यंत मनोरंजनात्मक प्रबोधन करत त्यांनी विद्यार्थ्यांना खिळवून ठेवले राष्ट्रभक्ती समाजनिष्ठा भावनिक जीवनशैली अशा विविध मुद्द्यांवर विद्यार्थ्यांना चिंतन करायला भाग पाडले समाजातील अनिष्ट रूढी परंपरा व्यसनाधीनता कुटुंब व समाजव्यवस्थेप्रति अनादराची भावना अशा मुद्द्यांचा विचार करायला विद्यार्थ्यांना भाग पडणारे त्यांचे भाषण कौशल्य कविता, पोवाडे शेर शायरी व स्फूर्ती गीतांमधून अधिकच खुलले निसर्गदत्त पहाडी व शाहिरी आवाजाचा चपखल वापर करत त्यांनी कलेचा सुंदर नमुना मांडला त्याला सर्वांनीच मनापासून दाद दिली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा नगराध्यक्ष अभय आव्हाड तर प्रमुख पाहुणे म्हणून उपाध्यक्ष ॲड सुरेश आव्हाड प्राचार्य डॉ बबन चौरे शारीरिक शिक्षण संचालक डॉ विजय देशमुख सचिन शिरसाठ अशोक डोळस अशोक कानडे आदी उपस्थित होते यावेळी कला क्रीडा साहित्य संस्कृती यासह सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले यावेळी बोलताना डॉ महावीर सिंग चौहान म्हणाले की महाविद्यालयीन जीवनामध्ये जगण्याची जशी दिशा ठरते तसा आत्मविश्वास सुद्धा मिळवला जातो याच वयामध्ये सामाजिक बुद्धीचा सुद्धा परिपूर्ण विकास झालेला असल्याने विद्यार्थ्यांना स्वतः निर्णय क्षम व्हावेसे वाटते मात्र हाच कालावधी दिशा चुकण्याचा असल्याने कुटुंबीयआप्तेष्ट हितचिंतक शिक्षक पालक अशा अनुभवी लोकांबरोबर चर्चा करत विद्यार्थ्यांनी पावले टाकायला हवीत कोणतीही कला मानवी जीवनास परिपूर्ण आनंद देत अर्थपूर्ण बनविते माणूस म्हणून जन्माला येणे भाग्य असले तरी कवी म्हणून जगणे हे सौभाग्याचे लक्षण आहे कविता वाचता येत नाही तर ती समजावून घ्यावी लागते.



पाथर्डी तालुक्यासारख्या डोंगराळ दुष्काळी कष्टकरी ऊसतोड कामगार मजुरांच्या तालुक्यामध्ये शिक्षणाची गंगा आणण्याचे पवित्र काम स्व.बाबूजी आव्हाड यांनी केले या महाविद्यालयातून हजारो विद्यार्थी उच्चशिक्षित होऊन समाजात कर्तुत्ववान म्हणून मिरवत आहेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अशा पद्धतीने सोयीसुविधा साठ वर्षांपूर्वी उपलब्ध करून देण्याने बाबूजींची दूरदृष्टी जशी नजर पुढे येते तसे संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मोलाचे योगदान लाभत असल्याने या महाविद्यालयाने सर्वच क्षेत्रात भरीव प्रगती करून पुणे विभागात स्वतःचा दबदबा तयार केला आहे शिक्षण हे केवळ पदवी मिळवण्यापुरतेच नसून मनापासून ज्ञान आत्मसात करण्यासाठी असावे याच अध्ययन पद्धती मधून साहित्य प्रेमाची बीजे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रुजली तर महाविद्यालय म्हणजे साहित्यिक तयार करणारे सुद्धा व्यासपीठ ठरेल.

**अभय आव्हाड**-अध्यक्ष पार्थ विद्या प्रसारक मंडळ व नगराध्यक्ष पाथर्डी

# सोलापूर-धुळे महामार्गावर 'टायगर गेम'चा सापळा

## 'आरटीओ'ची भीती दाखवून ट्रक चालकांची लूट

धाराशिव। प्रतिनिधी

सोलापूर - धुळे महामार्गावरील उपळाई पाटी परिसरात (जि. धाराशिव) ट्रक चालकांची 'टायगर गेम'च्या नावाखाली लूट होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर येत आहे. मागील सहा महिन्यांपासून हा प्रकार सुरू असल्याची चर्चा वाहन चालकांमध्ये होत असून या मार्गाने प्रवास करणाऱ्या ट्रक चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उपळाई पाटीजवळ रस्त्याच्या कडेला एक आयशर टेम्पो आणि एक पिकअप वाहन उभे केले जाते. या वाहनाजवळ काही जण थांबून महामार्गावरून येणाऱ्या ट्रक वाहनांना हात करून थांबवतात. ट्रक चालक थांबल्यानंतर त्यांना पुढे आरटीओची तपासणी सुरू असल्याचे सांगितले जाते. ''आम्हीही आरटीओच्या भीतीने थांबलो आहोत,'' असे सांगून चालकांना काही वेळ तिथेच थांबवले जाते. यानंतर चालकांना वेळ घालवण्यासाठी 'टायगर गेम' खेळण्याचा प्रस्ताव दिला जातो. सुरुवातीला एक-दोन गेम ट्रक चालकाला जिंकू दिले जातात, त्यामुळे चालकांचा विश्वास बसतो. त्यानंतर चालकांकडून अधिक पैसे लावून खेळ सुरू केला जातो. मात्र, पुढील खेळांमध्ये चालक एकही गेम जिंकू शकत नाही. अशा प्रकारे हळूहळू खेळाच्या नावाखाली चालकांकडील रोख रक्कम घेतली जाते. काही प्रकरणांमध्ये दबाव टाकून किंवा धाक दाखवून चालकाच्या जवळ असलेले सर्व पैसे काढून घेतल्याची चर्चा वाहनचालकांमध्ये होत आहे.

वाहन चालकांच्या म्हणण्यानुसार, उपळाई पाटी परिसरात हा प्रकार गेल्या सहा महिन्यांपासून सुरू आहे. त्यामुळे अनेक ट्रक चालक या भागातून जाताना सावध राहत असल्याचे सांगितले जाते. दरम्यान, या प्रकाराबाबत येरमाळा पोलिसांना माहिती आहे का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. काही नागरिकांमध्ये या प्रकरणात पोलिसांचे दुर्लक्ष किंवा लागेबांधे असल्याचीही चर्चा होत असल्याचे सांगितले जात आहे.

दैनिक
राज्य लोकतंत्र



# बीडनंतर आष्टी न्यायालयात वकीलावर हल्ला

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी न्यायालय परिसरात शुक्रवारी दुपारी एका वकिलावर पक्षकाराने चपलेने मारहाण करून गळा आवळण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना घडली. तसेच वकिलाच्या शर्टच्या खिशातील पाच हजार रुपये जबरदस्तीने काढून घेत जिवे मारण्याची धमकी दिल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, आष्टी येथील अ‍ॅड. मधुकर सदाशिव झांजे (वय ६०) हे शुक्रवारी (दि. ६) नेहमीप्रमाणे सकाळी न्यायालयीन कामकाजासाठी आष्टी न्यायालयात आले होते. दुपारी सुमारे दोनच्या सुमारास न्यायालय परिसरात अ‍ॅड. काशीनाथ फुंदे यांच्या टेबलवर शिवाजी बबन बनसोडे विरुद्ध मारुती बनसोडे या प्रकरणाबाबत मध्यस्थी केंद्राकडे पाठविण्याच्या संदर्भात चर्चा सुरू होती.

यावेळी पक्षकार मारुती बनसोडे याने अ‍ॅड. झांजे यांना ''तुम्ही सारख्या सारख्या तारखा वाढवता, आमच्या प्रकरणाचा निकाल होऊ देत नाही,'' असे म्हणत मोठ्या आवाजात वाद घातला. त्यावर झांजे यांनी कोर्ट रजेवर असल्याचे सांगितले असता संतप्त झालेल्या बनसोडे याने झांजे यांचे गचुडे धरून चपलेने डोक्यावर तीन-चार वेळा मारहाण केली व खाली पाडले.

त्यानंतर त्याने गळ्यातील पंचा काढून झांजे यांच्या गळ्याभोवती आवळून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. झांजे यांनी आरडाओरडा केल्यानंतर तेथे उपस्थित अ‍ॅड. काशीनाथ फुंदे, अ‍ॅड. भाऊसाहेब आजबे, अ‍ॅड. किशोर मुळे आणि अ‍ॅड. शेख शहाबाज यांनी मध्ये पडून त्यांना सोडविले.दरम्यान, बनसोडे याने झांजे यांच्या शर्टच्या खिशातील सुमारे पाच हजार रुपये जबरदस्तीने काढून घेतल्याचा आरोपही फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच त्याची पत्नी पारुबाई बनसोडे हिनेही शिवीगाळ केल्याचे नमूद करण्यात आले आहे. दोघांनीही ''पुन्हा दिसलास तर खात्मा करू,'' अशी जिवे मारण्याची धमकी देत तेथून निघून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. या घटनेमुळे न्यायालय परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. सदर प्रकरणी मारुती बनसोडे व पारुबाई बनसोडे यांच्या विरोधात आष्टी पोलीस ठाण्यात फिर्याद देण्यात आली असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

उद्योग क्षेत्रातील भरीव कार्याबद्दल

# अ‍ॅड.प्रकाश कवठेकर यांना 'मराठा भूषण' पुरस्कार वितरण




बीड । प्रतिनिधी

उद्योग क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल अ‍ॅड. प्रकाशदादा कवठेकर यांना मराठा सेवा संघातर्फे प्रतिष्ठेचा 'मराठा भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. समाजहिताच्या विविध उपक्रमांसह उद्योग क्षेत्रात केलेल्या कार्याची दखल घेत हा सन्मान देण्यात आला.

अ‍ॅड. प्रकाशदादा कवठेकर यांनी उद्योग क्षेत्रात सातत्याने प्रगती करत अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांनी ''तेजस इलेक्ट्रिकल अँड सप्लायर्स'' ही कंपनी सन २००६ पासून यशस्वीपणे चालवली असून या व्यवसायाच्या माध्यमातून विविध शासकीय, निमशासकीय व खासगी कामांमध्ये इलेक्ट्रिकल साहित्य पुरवठा व सेवा देण्याचे काम सुरू आहे. तसेच त्यांनी २०२३ साली ''ऑक्सीतेज मिनरल वॉटर'' या कंपनीची स्थापना करून शुद्ध पिण्याच्या पाण्याचा उद्योग सुरू केला. या कंपनीच्या माध्यमातून महाराष्ट्रातील दहा जिल्ह्यांमध्ये मिनरल वॉटरचे वितरण जाळे उभारण्यात आले असून या व्यवसायातून अनेक युवकांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.उद्योगासोबतच सहकार व सामाजिक क्षेत्रातही अ‍ॅड. कवठेकर यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेली तेजस अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड, बीड ही संस्था २०१६ पासून कार्यरत असून विविध कर्ज योजना, धान्य तारण योजना यांसारख्या उपक्रमांद्वारे सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक आधार देण्याचे काम करत आहे.अ‍ॅड. प्रकाशदादा कवठेकर यांच्या या सर्वांगीण कार्याची दखल घेत मराठा सेवा संघाने 'मराठा भूषण' पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. पुरस्कार स्वीकारताना त्यांनी हा सन्मान समाजाच्या विश्वासाचे प्रतीक असल्याचे सांगत पुढील काळातही उद्योग, सहकार व सामाजिक क्षेत्रात अधिक जोमाने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.या सन्मानाबद्दल विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अ‍ॅड. प्रकाशदादा कवठेकर यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# रिक्षाचालकावर बार्शी नाका परिसरात सहाजणांचा जीवघेणा हल्ला

**बीड । प्रतिनिधी**

धुरवडीच्या दिवशी बीड शहरातील बार्शी नाका परिसरात मंगळवारी सायंकाळी भीषण मारहाणीची घटना घडून परिसरात खळबळ उडाली. इमामपूर रोडवरील प्रकाश आंबेडकर नगर येथे पाच ते सहा जणांच्या टोळीने रिक्षाचालक अमोल कांबळे यांच्यावर लोखंडी रॉड व लाकडांनी जीवघेणा हल्ला करत बेदम मारहाण केली. या हल्ल्यात अमोल कांबळे गंभीर जखमी झाले असून त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने बीड जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, दि. ३ मार्च रोजी सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास ही थरारक घटना घडली. अचानक झालेल्या हल्ल्यात अमोल कांबळे यांच्या डोक्यावर गंभीर वार करण्यात आले. लोखंडी रॉड व लाकडांनी केलेल्या मारहाणीमुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून शरीरावरही मारहाणीचे गंभीर व्रण दिसून आले आहेत.

घटनास्थळी मोठ्या प्रमाणात रक्त सांडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.घटनेची माहिती मिळताच पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती खेडकर यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर त्यांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात जाऊन जखमी अमोल कांबळे यांची भेट घेतली. डॉक्टरांनी त्यांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगितले आहे.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक पुजारी आणि पोलीस हेडकॉन्स्टेबल रमेश भोले करत आहेत. दरम्यान, धुरवडीच्या दिवशी घडलेल्या या रक्तरंजित घटनेमुळे बार्शी नाका परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# अभिमानास्पद: परळीच्या हर्षवर्धन तिडकेचा यूपीएससीत डंका

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील पांगरी येथील भूमिपुत्र हर्षवर्धन अशोक तिडके यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ३५५ वी रँक मिळवली. त्यांच्या या यशामुळे परळी तालुक्यासह बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. या यशाबद्दल सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होऊ लागला आहे.



हर्षवर्धन तिडके हे लातूर येथे कार्यरत असलेले कृषी अधिकारी अशोक तिडके यांचे चिरंजीव आहेत. त्यांचे प्राथमिक शिक्षण अंबाजोगाई येथे झाले, तर माध्यमिक शिक्षण लातूर येथे पूर्ण झाले. दहावीच्या परीक्षेत गुणवंत विद्यार्थी म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला होता. पुढे अकरावी व बारावीचे शिक्षण त्यांनी लातूर येथील शाहू कॉलेजमध्ये पूर्ण केले.

उच्च शिक्षणासाठी त्यांनी देशातील नामांकित शिक्षणसंस्था आयआयटी पवई येथे प्रवेश घेतला आणि तेथून पदवी शिक्षण पूर्ण केले. विशेष म्हणजे कोणतेही स्पर्धा परीक्षेचे कोचिंग क्लास न लावता स्वतःच्या जिद्द, परिश्रम आणि नियोजनबद्ध अभ्यासाच्या जोरावर त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी केली. हर्षवर्धन तिडके यांचे हे यश विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते तसेच नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# वडिलांसोबत महाविद्यालयात गेलेली तरुणी बेपत्ता

## केज तालुक्यात तीन दिवसात दोन घटना

बीड । प्रतिनिधी

केज येथील दोन विद्यार्थिनी अचानक बेपत्ता झाल्याने केज तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. अवघ्या तीन दिवसांत या दोन घटना घडल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. पहिली घटना बुधवारी (४ मार्च) घडली. नामेवाडी येथील जयश्री मधुकर केदार (२२) ही 'जीवन शिक्षण महाविद्यालया'त बी.एस्सी. द्वितीय वर्षात शिकत आहे. ती वडिलांसोबत परीक्षा फी भरण्यासाठी महाविद्यालयात आली होती. फी भरल्यानंतर दोघेही पोर्चमध्ये बसले असताना, दुपारी २ वाजेच्या सुमारास जयश्री वडिलांची नजर चुकवून बेपत्ता झाली. नातेवाईकांकडे शोध घेऊनही ती न सापडल्याने वडील मधुकर केदार यांनी केज पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. दुसरी घटना काळेगाव (घाट) येथील योगेश्वरी नंदकिशोर कोठावळे (१८) हिच्याबाबत घडली. ती 'भाऊसाहेब पाटील अध्यापक विद्यालया'त शिक्षण घेत आहे. २ मार्च रोजी दुपारी अडीच वाजता ती कोणालाही न सांगता विद्यालयातून निघून गेली. याप्रकरणी नंदकिशोर कोठावळे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी नोंद केली आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. दरम्यान, योगेश्वरी ही आळंदी येथे असल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे. या प्रकरणातील संशयित आरोपीसह दोघांनाही लवकरच ताब्यात घेण्यात येईल, अशी माहिती जमादार शकील शेख यांनी दिली आहे.

## बस स्टँडच्या मागील बाजूस तरुणाचा मृतदेह आढळल्याने खळबळ

बीड । प्रतिनिधी

शहरांच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या बसस्थानकाच्या पाठीमागील बाजूस २५ वर्षीय तरुणाचा संशयास्पदरीत्या मृतदेह आज सकाळी आढळून आला. घटनेची माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. गांधीनगर भागात राहणाऱ्या नौशाद नावाचा २५ वर्षीय तरुणाचा संशयास्पदरीत्या मृतदेह आढळून आला. ही घटना बीड बसस्थानकाच्या पाठीमागून जाणाऱ्या रस्त्यालगत घडली.

मृतदेहाच्या डोक्याला मार लागल्याची खूण नसली तरी नाका कानातून रक्त आल्याने त्याचा खून झाला की आणखी काही हे सांगण अवघड झाल असून घटनेची माहिती मिळताच हे.कॉ.सह शिवाजीनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवला आहे. पोस्टमार्टम रिपोर्ट मधूनच मृत्यू नेमका कशामुळे झाला हे स्पष्ट होणार आहे. दरम्यान संशयास्पद रित्या वर्दळीच्या ठिकाणी मृतदेह आढळल्यामुळे खळबळ माजली आहे. पुढील तपास शिवाजीनगर पोलीस करीत आहे.

# आष्टी मतदारसंघात विकासाचा धडाका
# २५ कोटींच्या रस्ता सुधारणा कामांना मंजुरी

### आ. सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला मोठे यश; ग्रामीण दळणवळणाला मिळणार नवी गती

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी-पाटोदा-शिरूर (कासार) विधानसभा मतदारसंघात विकासकामांना वेग आला असून विविध महत्त्वाच्या रस्त्यांच्या सुधारणा व पुलांच्या पुनर्बांधणीसाठी तब्बल २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निधी उपलब्ध झाला असून या कामांमुळे ग्रामीण भागातील दळणवळण व्यवस्था अधिक सक्षम होणार आहे.



मतदारसंघातील अनेक रस्ते गेल्या काही वर्षांपासून अत्यंत नादुरुस्त अवस्थेत होते. त्यामुळे शेतकरी, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही बाब लक्षात घेऊन आमदार सुरेश धस यांनी मार्च २०२६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लेखाशीर्ष ५०५४-०४ अंतर्गत आष्टी, पाटोदा व शिरूर (कासार) तालुक्यातील विविध रस्त्यांच्या दुरुस्ती व सुधारणा कामांसाठी निधी मंजूर करण्याची मागणी शासनाकडे केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश आले असून या रस्ते कामांना मंजुरी देण्यात आली आहे.

मंजूर करण्यात आलेल्या कामांमध्ये कानडीआनंदवाडीपिंपरी घुमरी रस्ता, कडानिमगाव चोभानांदा रस्ता, बावीकणसेवाडीबीडसांगवीदेसूरशेकापूरआष्टी जामगावबळेवाडी मार्ग, चोभा निमगावकानडी बुद्रुक रस्ता, पालवन नागझरी बेनसूर भायाळा वैद्यकिन्ही वैजाळा पाचेगाव पाचंग्री मार्ग यांसह अनेक महत्त्वाच्या रस्त्यांचा समावेश आहे. तसेच घोगसपारगावमाथुरीसावरगाव मार्गे शिरूर, दहिवंडी, रुपुर,

◀◀ पान ३ वर

# माहिती देण्यास पाटोदा नगरपंचायतीची टाळाटाळ
# दत्ता वाघमारे यांचा अर्धनग्न आमरण उपोषणाचा इशारा

पाटोदा । प्रतिनिधी

माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविलेली माहिती वेळेत न देता पाटोदा नगरपंचायतीकडून टाळाटाळ सुरू असल्याचा आरोप करत दत्ता नाथा वाघमारे यांनी संताप व्यक्त केला असून, पुढील पाच दिवसांत माहिती न दिल्यास नगरपंचायतीच्या कार्यालयासमोर अर्धनग्न स्वरूपात बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. या इशाऱ्यामुळे स्थानिक प्रशासनात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, दत्ता वाघमारे यांनी ३० डिसेंबर २०२५ रोजी माहिती अधिकार कायद्यांतर्गत तसेच वैयक्तिक हस्तलिखित स्वरूपात पाटोदा नगरपंचायतीकडे अर्ज दाखल केला होता. या अर्जामध्ये ''माहिती अधिकार नमुना पत्र 'अ' व माहिती अधिकार द्वितीय अपील नुसार सुधारीत प्रस्तावासह पाठविण्यात आलेल्या कागदपत्रांची माहिती'' मागविण्यात आली होती. नियमानुसार सदर माहिती ३० जानेवारी २०२६ पर्यंत देणे बंधनकारक होते.मात्र, पाटोदा नगरपंचायतीकडून अद्यापही माहिती देण्यात आलेली नसल्याचा आरोप वाघमारे यांनी केला आहे. उलट वारंवार नगरपंचायत कार्यालयाकडून टाळाटाळीची उत्तरे दिली जात असून माहिती देण्यास जाणीवपूर्वक विलंब लावला जात असल्याचे त्यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.यामुळे संतप्त झालेल्या वाघमारे यांनी प्रशासनाला स्पष्ट इशारा देत म्हटले आहे की, पुढील पाच दिवसांत संबंधित कागदपत्रांची पूर्तता न केल्यास पाटोदा नगरपंचायतीच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर अर्धनग्न स्वरूपात बेमुदत आमरण उपोषणास बसणार असून त्या दरम्यान घडणाऱ्या कोणत्याही अनुचित घटनेची सर्वस्वी जबाबदारी पाटोदा नगरपंचायत प्रशासन व संबंधित कर्मचारी वर्गावर राहील,असे त्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान,या प्रकरणामुळे माहिती अधिकार कायद्याच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून पाटोदा नगरपंचायत प्रशासनाची भूमिका काय राहणार याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# कापसी येथील पोलीस पाटील पदभरतीवर आक्षेप; प्रवर्गातील अर्जांची चौकशी करण्याची मागणी

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील कापसी गावातील पोलीस पाटील पदभरती प्रक्रियेवर काही ग्रामस्थांनी कायदेशीर आक्षेप नोंदविला असून, (आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक) प्रवर्गातून दाखल झालेल्या अर्जांची सखोल चौकशी करण्याची मागणी प्रशासनाकडे केली आहे.

पोलीस पाटील पदभरती सन २०२५-२०२६ अंतर्गत कापसी ता. आष्टी जि. बीड येथील पोलीस पाटील पद हे प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आले आहे. मात्र गावातील काही ग्रामस्थांनी उपविभागीय अधिकारी, पाटोदा यांच्याकडे लेखी निवेदन देत या प्रक्रियेवर आक्षेप नोंदविला आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कापसी गावातील मूळ रहिवासी कुटुंबांपैकी कोणतीही व्यक्ती आरक्षणाच्या निकषात बसत नसून, गावात पात्र उमेदवार उपलब्ध नाहीत. तरीदेखील काही व्यक्तींनी महसूल विभागाची दिशाभूल करून किंवा चुकीची माहिती देऊन प्रमाणपत्र मिळवले असून त्या आधारे पोलीस पाटील पदासाठी अर्ज दाखल केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

महाराष्ट्र पोलीस पाटील नियम १९६८ तसेच शासनाच्या नियमानुसार उमेदवाराने अर्ज करताना दिलेली माहिती सत्य असणे आवश्यक आहे. खोटी माहिती किंवा बनावट कागदपत्रे सादर केल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरतो, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच भारतीय न्याय संहिता अंतर्गत सरकारी कामकाजात खोटी कागदपत्रे सादर करणे हा गंभीर गुन्हा असल्याचेही ग्रामस्थांनी

◀◀ पान ३ वर

# नरेगा प्रभारी बिडिओपदी जयलाल राजपुत

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणी पुरवठा विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी जयलाल राजपुत यांच्याकडे पंचायत विभागातील नरेगा विभागाचे प्रभारी गट विकास अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. राजपूत यांनी त्या पदाचा कार्यभार नुकताच स्वीकारला आहे. यापूर्वी उद्धव सानप हे नरेगा विभागाच्या गटविकास अधिकारीपदी कार्यरत होते. त्यांच्याकडे नरेगा आणि पाटोदा बिडिओचा कार्यभार असल्याने त्याच्याकडील नरेगा पदभार काढण्यात आला आहे. राजपुत हे कार्यक्षम, सर्वत्र परिचित असल्याने या विभागातील योजनेला अधिक गती येईल, असे वाटते.



# पोद्दार शाळा पुन्हा आरटीई प्रवेशासाठी खुली :गोरगरीब विद्यार्थ्यांना दिलासा

बीड । प्रतिनिधी

अल्पसंख्यांक दर्जा देण्यात आलेल्या आणि नंतर तो निर्णय रद्द झालेल्या राज्यातील ७५ शाळांचा आरटीई पोर्टलवर तात्काळ पुनःसमावेश करण्याची मागणी शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांनी केली होती. त्यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत शिक्षण विभागाने संबंधित शाळांचा आरटीई पोर्टलवर पुनःसमावेश करण्याचा निर्णय घेतला असून यामध्ये बीड येथील पोद्दार शाळेचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे आता ही शाळा आरटीई प्रवेशासाठी पुन्हा उपलब्ध झाली आहे.

मनोज जाधव यांनी या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अल्पसंख्यांक मंत्री, शिक्षण मंत्री तसेच प्राथमिक शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना निवेदन सादर करून विद्यार्थ्यांच्या हिताचा मुद्दा मांडला होता. या मागणीची दखल घेत शिक्षण संचालकांनी दि. ४ मार्च रोजी राज्यातील सर्व शिक्षणाधिकाऱ्यांना संबंधित शाळांचा आरटीई पोर्टलवर तात्काळ पुनःसमावेश करण्याबाबत आदेश जारी केले.

दरम्यान, अल्पसंख्यांक दर्जा देण्याच्या प्रक्रियेत गंभीर गैरव्यवहार झाल्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने संबंधित निर्णयाला स्थगिती दिली होती. त्यानंतर अल्पसंख्यांक प्रमाणपत्र देण्यात आलेल्या ७५ शाळांची नावे आरटीई पोर्टलवरून वगळण्यात आली होती. यामध्ये बीड जिल्ह्यातील पोद्दार शाळेचाही समावेश होता.यामुळे या शाळेत आरटीईमार्फत आपल्या पाल्यांचे प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनेक पालकांना अर्ज प्रक्रियेत अडचणी येत होत्या. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू कुटुंबांतील विद्यार्थ्यांचे प्रवेशप्रक्रियेत नुकसान होत असल्याची बाब मनोज जाधव यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली होती आणि या शाळेचा आरटीई पोर्टल वर समावेश करण्याची मागणी केली होती.

ज्या तत्परतेने शाळांना अल्पसंख्यांक दर्जा देऊन त्यांची नावे आरटीई पोर्टलवरून वगळण्यात आली, त्याचप्रमाणे निर्णय रद्द झाल्यानंतर त्या शाळांचा आरटीई पोर्टलवर तात्काळ समावेश करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली होती. शासनाने या मागणीची दखल घेत सकारात्मक निर्णय घेतला असून संबंधित विभागाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

त्यामुळे आता राज्यातील संबंधित शाळांचा आरटीई पोर्टलवर पुन्हा समावेश झाला असून बीड येथील पोद्दार शाळा देखील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी उपलब्ध झाली आहे, अशी माहिती मनोज जाधव यांनी दिली.

त्याच बरोबर राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अल्पसंख्यांक मंत्री, शिक्षण मंत्री तसेच प्राथमिक शिक्षण संचालक यांचे त्यांनी या निर्णया संदर्भात आभार मानले आहेत.

# सातवी महाराष्ट्र स्टेट ओपन कराटे चॅम्पियनशिपमध्ये केजच्या विद्यार्थ्यांचे यश

केज । प्रतिनिधी

लातूर येथील श्री श्री रविशंकर विद्यालय या ठिकाणी सातवी महाराष्ट्र स्टेट ओपन कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेमध्ये राज्यातील जवळपास सर्व जिल्ह्यातून स्पर्धक आले होते या स्पर्धेमध्ये केज येथील टी एस शोतोकॉन कराटे असोसिएशनच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. आठ वर्षीय वयोगटामध्ये राजवीर दुर्गादास लांब यांनी ( सिल्वर मेडल ), कारण हंकारे ( ब्रान्स मेडल )




बारा वर्षे वयोगटातील अगस्ती पटाईत ( गोल्ड मेडल ), सोहम डोईफोडे ( सिल्वर ), साई नेहरकर ( सिल्वर मेडल ), आदित्य वनवे (सिल्वर मेडल ), सायंजू वाघमारे ( सिल्वर मेडल ), अकरा वर्षे वयोगटातील विराट नेमटे (सिल्वर मेडल ), १४ वर्षे वयोगटातील करण मोडवे (सिल्वर मेडल )

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# होय, त्यावेळी इराणने माझं विमान पाडण्याचा इशारा दिला होता; एकनाथ शिंदेंनी कबुली दिल्याचा रोहित पवारांचा दावा



**पुणे । प्रतिनिधी**

एकनाथ शिंदे हे २०२३ साली दावोसला जात असताना इराण आणि इराकच्या लष्कराने त्यांचे विमान पाडण्याचा इशारा दिल्याचा खळबळजनक गौप्यस्फोट आमदार रोहित पवार (ठेहळीं झरुरी) यांनी अलीकडेच केला होता. एकनाथ शिंदे (एज्ञपरींह डहळपवश) यांनी हा दावा खरा असल्याचे सांगत या गोष्टीला दुजोरा दिल्याचा दावा रोहित पवार यांनी केला. मी एकनाथ शिंदे यांना भेटलो तेव्हा त्यांनी अशी घटना घडल्याचे मान्य केले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना दावोसला (ऊँीं) जाताना इराक आणि इराणच्या (खीरप) बॉर्डरवर विमानाने हवाई उड्डाणची परवानगी न घेतल्यामुळे विमान पाडण्याचा इशारा दोन्ही देशांनी दिला होता. १६ ते २० जानेवारी २०२३ दरम्यान एकनाथ शिंदे साहेब दावोसला गेले होते. आंतरराष्ट्रीय प्रवासात 'फ्लाईट प्लॅन' द्यावा लागतो आणि इतर देशांची परवानगी घ्यावी लागते. बिना परवानगी जर विमान त्या देशामध्ये गेलं तर ते विमान पाडलही जाऊ शकतं आणि तसेच काहीतरी हे एकनाथ शिंदे साहेबांच्या बाबतीत घडले. विमानात इंधन (ठशर्षीशश्रळपस) भरल्यानंतर ते झुरिकला जात असताना इराणच्या हद्दीतून गेले. इराणने सांगितलं होतं तुम्ही जर आत्ताच्या आता नाही वळला तर तुमचं विमान आम्ही पाडू. त्यावेळी या विमानात स्वतः एकनाथ शिंदे आणि इतर काही अधिकारी बसले होते. इराणने हटकल्यानंतर विमान इराकच्या बाजूला गेले, पण इराकने सुद्धा हेच केलं असे ते म्हणाले. शेवटी कोणतीही परवानगी नसल्याने ते विमान माघारी गेले आणि सगळ्या परमिशन तिथे घेतल्या आणि मग एकनाथ शिंदे झुरिकला गेले, असे रोहित पवार यांनी सांगितले होते.

व्हीएसआर कंपनीचा मालक व्ही.के. सिंग हा सीआयडीला भेटण्यासाठी आला होता. पोलिसांना भेटायला आलेल्या या माणसासोबत बंदूकधारी सिक्युरिटी होती, अकरा ते आडे अकरा वाजता सिंग सीआयडी कार्यालयात आल्याचं आम्हाला समजलं, नाष्ट्यापासून जेवणापर्यंत आणि आम्हाला कळलं की, संध्याकाळी अर्धा एक तास क्रिकेटची मॅच सुद्धा त्यांना पोलीसस्टेशन मध्ये टिव्हीवरती दाखवली अशी माहिती आहे. येतानाच फुटेज आपल्याकडे आहे, पण जाताना ते कोणत्या गाडीत गेले, ते लोकांना कळलं नाही, मिडीयाशी आणि तिथे असलेल्या कार्यकर्त्यांशी बोलल्यानंतर इतकंच कळलं, काळाबाजार करणाऱ्या या व्ही, के, सिंगला पोलिसांच्याच काळ्या गाडीमध्ये, काचा काळ्या असलेल्या गाडीतून नेण्यात आलं. पोलिसांनी त्याला इतकी व्हीआयपी ट्रीटमेंट दिली आहे, एका तपासामध्ये असलेल्या प्रमुख क्रिमीनल असलेल्या या अंगाने तपास करणाऱ्याला अशी वागणूक मिळणार म्हणजे फारच दुःख आहे. व्ही.के. सिंगला वाचवलं जात आहे, मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांना बहरीनला जाताना व्ही.के. सिंगचं विमान होतं, तेव्हा मोठा गोंधळ झाला होता. व्ही.के. सिंगला वाचवण्याचा मागे अनेक मोठे हात आहेत, त्याच्यामागे मोठे नेते आहेत, मात्र या चिरकूटला वाचविण्यासाठी अजित दादांना न्याय मिळत नाहीये, असं म्हणत रोहित पवारांनी संताप व्यक्त केला आहे.

# न्यायालयातच वकिलांची हाणामारी! पुण्यात पक्षकारांवरुन वाद टोकाला

**पुणे । प्रतिनिधी**

न्यायदेवतेच्या मंदिरात संयम, शिस्त आणि कायद्याचा आदर बाळगण्याची जबाबदारी ज्यांच्या खांद्यावर आहे, त्या वकिलांमध्येच शिवीगाळ, धक्काबुक्की ते थेट रक्तबंबाळ होईपर्यंत मारहाणीच्या घटना होऊ लागल्या आहेत. पक्षकारांची पळवापळवी हे या वादाचे मुख्य कारण असून, बहुतांश वेळा असे वाद न्यायालयातच मिटवले जातात. तर, काही घटना पोलिस ठाण्यापर्यंतही पोहोचत आहेत. त्यामुळे, संयम, सभ्यता आणि कायद्याच्या सन्मानाचे प्रतीक असलेल्या न्यायालयात वकिलांच्या हाणामारी कळीचा मुद्दा ठरत आहे.

शिवाजीनगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयातील वकिलांची संघटना असलेल्या पुणे बार असोसिएशनचे पंधरा हजारांहून अधिक सदस्य आहेत. राज्यातील ही दुसऱ्या क्रमांकाची वकिलांची संघटना आहे. पुण्यातील वकिलीला कै. विजयराव मोहिते, कै. श्रीकांत शिवदे, कै. विराज काकडे यांपासून एस. कै. जैन, सुधीर शहा आदी नामवंत वकिलांची समृद्ध परंपरा लाभलेली आहे. मात्र, अलीकडे स्पर्धा वाढल्याने पक्षकार मिळविणे, कमी शुल्कात काम करून देणे किंवा पक्षकार पळविणे अशा कारणांवरून वकिलांमध्ये वाद वाढताना दिसत आहेत. या वादांचे रूप अनेकदा गुद्दागुद्दी, कपडे फाडणे आणि रक्तबंबाळ करीत मारहाण करण्यापर्यंत पोहोचत आहे. अशा घटना प्रमाणाने कमी असल्या तरी न्यायालयाच्या आवारात घडत असल्याने वकिली व्यवसायाच्या विश्वासार्हतेवर आणि न्यायालयीन शिस्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

# सोशल मीडियावर व्हायरल वक्तव्य महागात; वसंत मोरे यांच्यावर गुन्हा दाखल

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील माजी नगरसेवक आणि शिवसेना ठाकरे पक्षाचे नेते वसंत कृष्णाजी मोरे (तरीरपीं चौश) यांच्या विरोधात अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत (ट्रॉसिटी क्ट) गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. ही कारवाई पुण्यातील शिवाजीनगर पोलीस (डहर्ळींरक्षळपरसरी झेश्रळलश डींरींळेप) ठाण्यामध्ये करण्यात आली आहे, तर विश्वनाथ तुकाराम लहाडे (वय ७२) यांनी दिलेल्या तक्रारीनंतर हा गुन्हा नोंदवण्यात आला असल्याची माहिती समोर आली आहे.



२५ फेब्रुवारी रोजी पुणे महानगरपालिकेत वसंत मोरे यांनी पत्रकार परिषद घेतली होती. या पत्रकार परिषदेत त्यांनी फिर्यादी विश्वनाथ लहाडे यांचा उल्लेख करत काही वक्तव्ये देखील केल्याचा आरोप करण्यात आलेला आहे. फिर्यादींच्या म्हणण्यानुसार, वसंत मोरे यांना आपण अनुसूचित जातीचे असल्याची माहिती असतानाही त्यांनी जाणीवपूर्वक व हेतूपूर्वक आपल्याबद्दल अपमानास्पद वक्तव्य केलं असल्याचं त्यांचं म्हणणं आहे.

तर फिर्यादींनी दिलेल्या तक्रारीनुसार, वसंत मोरे यांनी लहाडे इतका दारू पिला होता की त्याला बोलताही येत नव्हते, ओढ्यामध्ये उतरून गटारे साफ करत आहे असे वक्तव्य केले. तसेच हे वक्तव्य सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आल्याचा आरोपही फिर्यादींनी केला आहे. या व्हायरल व्हिडिओमुळे आपली सामाजिक बदनामी झाली असून, कुटुंबीयांवर मानसिक ताण आला आहे, असेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. सध्या कुटुंबीय भीतीच्या आणि तणावाच्या वातावरणात आहे, घरी भीतीचं वातावरण देखील निर्माण झालं असल्याचेही फिर्यादींनी पोलिसांना सांगितले आहे. या तक्रारीची दखल घेत शिवाजीनगर पोलिसांनी वसंत मोरे यांच्या विरोधात ट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत. पुण्याचे माजी नगरसेवक आणि शिवसेना ठाकरे गटाचे नेते वसंत मोरेंवर ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, पुण्यातील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पत्रकार परिषदेत विश्वनाथ लहाडे यांचा उल्लेख करत त्यांच्याबाबत आक्षेपार्ह आणि बदनामीकारक वक्तव्य केल्याने वसंत मोरे वर गुन्हा दाखल केला आहे. २५ फेब्रुवारीला पुणे महानगरपालिकेत वसंत मोरे यांनी पत्रकार परिषद घेतली होती या पत्रकार परिषदेत लहाडे दारू पिला होता त्याला बोलता येत नव्हतं ओढ्यामध्ये उतरून गटारे साफ करत होता, असं वक्तव्य केलं होतं. लहाडे यांनी यानंतर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. वसंत मोरे यांनी बदनामी केली त्यामुळे कुटुंबीयांवर मानसिक ताण आला आहे असं तक्रारीत नमूद केलं होतं. या तक्रारीनंतर शिवाजीनगर पोलीस ठाण्यात वसंत मोरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विश्वनाथ लहाडे हे तक्रारदार ७२ वर्षाचे आहेत आणि त्यांचा ठेकेदाराचा व्यवसाय होता.

# दारूच्या नशेत तरुण-तरुणीचा पोलीस ठाण्यात धिंगाणा, महिला पोलीस उपनिरीक्षकाच्या हाताचा घेतला चावा

**पुणे । प्रतिनिधी**

दारूच्या नशेत तरुणीने महिला पोलिस उपनिरीक्षकाच्या हाताचा चावा घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पुण्यातील बाणेर पोलिस ठाण्यात हा संपूर्ण प्रकार घडला आहे. आत्महत्या (झींपश ऊीळाश छशुी) करण्याची पोलिसांना धमकी देखील यावेळी तरूणीने दिली आहे, या तरुणीसह तिच्या मित्रावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दारूच्या नशेत तरुण तरुणीने पुण्यातील पोलिस ठाण्यात गोंधळ घातला.बालेवाडी येथील एका बारमध्ये मारहाण (झींपश ऊीळाश छशुी) झाल्याचे सांगून बारमध्ये तसेच पोलीस ठाण्यात दारूच्या नशेत गोंधळ घातला. या प्रकरणात महिला पोलीस उपनिरीक्षक यांनी फिर्याद दिली आहे. यावरून मानसी चंपालाल परिहार्या (२४) आणि युवराज निलेश परतानी (२४) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा प्रकार तीन मार्च रोजी रात्री पावणे बारा ते चार मार्च पहाटे ५.३० पर्यंत सुरू होता. पोलिसांनी या घटनेबाबत दिलेल्या माहितीनुसार, मानसी ही विद्यार्थिनी असून युवराज हा मूळचा हरियाणा या राज्याच्या असून पुण्यात नोकरी करतो. दोघेही मित्र असल्याने तीन मार्च रोजी पुण्यातील बालेवाडी येथील एका रेस्टॉरंटमध्ये ते पार्टीसाठी गेले. मद्यपान केल्यानंतर दोघांना कोणीतरी मारहाण केली. यावरून त्या दोघांनी हॉटेलमध्ये गोंधळ घातला. संबंधित ठिकाणी पोहोचल्यानंतर महिला पोलीस उपनिरीक्षक यांना मानसी ने आम्हाला मारहाण झाली असून मला हॉटेलचे सीसीटीव्ही फुटेज आत्ताच पाहिजे अशी मागणी केली. यावर हॉटेल मॅनेजर यांनी सीसीटीव्हीचे कंट्रोल युनिट मुंबईत असल्यामुळे उद्या फुटेज देतो असे सांगितले. पोलिसांनी या दोघांना पोलीस ठाण्यात येऊन तक्रार द्या असे सांगितले असता त्यांनी पोलिसांना शिवीगाळ करायला सुरुवात केली. या घटनेनंतर पोलीस त्या दोघांना घेऊन बाणेर पोलीस ठाण्यात आले तसेच त्यांना वैद्यकीय उपचार करण्याबाबत सांगितले असता या दोघांनी पुन्हा पोलीस ठाण्यात गोंधळ घालायला सुरुवात केली.




यावेळी मानसीने महिला अंमलदार यांना तू मला विचारणारी कोण? तू माझ्याशी अशा शब्दात बोलू नको असे बोलून गोंधळ सुरू केला. तसेच महिला पोलीस उपनिरीक्षक यांचा युनिफॉर्म ओढून त्यांच्या हाताला चावा घेतला. मी सुसाईड करून बाणेर पोलीस स्टेशन आणि तुम्हा सर्व पोलिसांची नावे लिहील अशी धमकी सुद्धा यावेळी तिने दिली. दुसऱ्या बाजूला, युवराज ने सुद्धा मी कोण आहे हे तुम्हाला दाखवून देतो माझी पावर वापरून तुमची नोकरी घालवतो, अशी धमकी पोलिसांना दिली, दोघांनी आम्ही उद्या सकाळी उपचार घेऊन पुन्हा पोलीस ठाण्यात येऊ असे सांगितले. मात्र अजून पर्यंत ते दोघेही पोलीस ठाण्यात आलेले नाहीत. दरम्यान सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी या दोघांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पुण्यात आंतरराज्य 'सनी गँग'चा पर्दाफाश; ६२ लाखांचे दागिने जप्त

**पुणे । प्रतिनिधी**


शहरात बंद सदनिकांचे कुलूप तोडून घरफोडी करणाऱ्या एका आंतरराज्य टोळीचा छडा लावण्यात विश्रामबाग पोलिसांना यश आले आहे. उत्तर प्रदेशातील कुख्यात 'सनी गँग'शी संबंधित असलेला आणि खून, खुनाचा प्रयत्न तसेच 'गँगस्टर क्ट'नुसार गुन्हे दाखल असलेल्या या सराईत गुन्हेगारांकडून पोलिसांनी ६२ लाखांचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त केले आहे. त्यांच्याकडून विश्रामबाग, खडक,समर्थ पोलिस ठाण्यातील एकूण ५ गुन्हे उघडकीस आणले आहेत. आकाश सुभाष (वय २३, रा. सुंदरनगरी, दिल्ली; मूळ रा. मेरठ, उत्तर प्रदेश), जितेंद्र चतुर्वेदी (वय ३२, रा. सुंदरनगरी, दिल्ली) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

## महिला दिनानिमित्त सूर्यदत्ततर्फे विनामूल्य कर्करोग तपासणी शिबिर

**पुणे । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिटच्यूटसच्या सूर्यदत्त इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सतर्फे शनिवारी (दि. ७ मार्च) पुरुष व महिलांसाठी विनामूल्य कर्करोग तपासणी आणि जनजागृती मोहीम आयोजित करण्यात आली आहे. संस्थेच्या बावधन कॅम्पसमध्ये हे शिबिर सकाळी ९ ते सायंकाळी ४ या वेळेत होणार आहे.

राहुरी येथील साईधाम कॅन्सर चॅरिटेबल हॉस्पिटल आणि डॉ. माने मेडिकल फाउंडेशन यांच्या सहकार्याने हा उपक्रम राबवण्यात येत आहे. साईधाम मॉडेल ऑफ कॅन्सर केअरचे प्रवर्तक डॉ. स्वप्नील माने यांच्या मार्गदर्शनाखाली 'साई संजीवनी क्लिनिक ऑन व्हील्स'च्या माध्यमातून तोंडाचा कर्करोग, स्तन कर्करोग आणि गर्भाशय विकार यांची तपासणी केली जाणार आहे. याशिवाय सूर्यदत्त इन्स्टिटच्यूट ऑफ हेल्थ सायन्सच्या फिजिओथेरपी विभागाचे तज्ज्ञ स्नायू व हाडांचे आरोग्य, पुनर्वसनाची गरज आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना यांबाबत सविस्तर तपासणी करणार आहेत.




कर्करोगाची लक्षणे लवकर ओळखणे आणि वेळेत उपचार सुरू करता यावेत, यासाठी जनजागृती करणे हे या शिबिराचे मुख्य उद्दिष्ट आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्या सर्वांना मोफत तपासणी आणि तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन मिळणार आहे, असे संस्थेचे प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी सांगितले.

# शिवनेरी किल्ल्यावर मधमाशांचा हल्ला; चार शिवभक्त जखमी

**लेण्याद्री । पतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त शिवनेरी किल्ला येथे मोठ्या संख्येने शिवभक्तांनी गर्दी केली असताना अचानक मधमाशांच्या थव्याने हल्ला केल्याची घटना घडली. या घटनेत चार शिवभक्त जखमी झाले असून त्यापैकी दोघांना उपचारासाठी जुन्नर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिवजयंती निमित्त हजारो शिवभक्त शिवजन्मस्थळाचे दर्शन घेण्यासाठी गडावर आले होते. याचदरम्यान शिवजन्मस्थळाच्या परिसरात असलेल्या मधमाशांच्या पोळ्यांमधून अचानक थवा बाहेर पडला आणि काही भाविकांवर हल्ला केला. अचानक झालेल्या या प्रकारामुळे काही काळ परिसरात घबराट निर्माण झाली. अनेक भाविकांनी सुरक्षित ठिकाणी धाव घेतली.

घटनेची माहिती मिळताच वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी तत्परता दाखवत जखमी भाविकांना गडावरून खाली आणले आणि त्यांना तातडीने उपचारासाठी जुन्नर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मधमाशांच्या हल्ल्यात विकास मोहन जमादार (रा. चिखली) आणि धनंजय विजय दाभाडे (रा. चिखली) हे शिवभक्त जखमी झाले असून त्यांच्यावर जुन्नर येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या दोघांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय अधीक्षक डॉ. श्रीहरी सारोक्ते यांनी दिली. वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, उन्हाचा वाढलेला तडाखा, भाविकांकडून वापरले जाणारे सुगंधी स्प्रे तसेच मोठ्या प्रमाणावर होणारा गोंगाट यामुळे मधमाशा अस्वस्थ होऊन हल्ला करण्याची शक्यता वाढते. त्यामुळे गडावर येणाऱ्या पर्यटकांनी आणि भाविकांनी अशा ठिकाणी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, शिवजयंती उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गडावर मोठ्या प्रमाणावर भाविकांची गर्दी होत असल्याने प्रशासनाकडून सुरक्षा आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी वनविभागाकडून परिसराची पाहणी करण्यात येत असल्याची माहितीही मिळाली आहे.

## महिला दिनानिमित्त पुणे मेट्रोचा मोठा निर्णय; महिलांसाठी ४६, ज्येष्ठ नागरिकांसाठी ८ जागा राखीव

**पुणे । प्रतिनिधी**

महिला आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सोयीसाठी व सुरक्षित प्रवासासाठी पुणे मेट्रोकडून महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर रविवार, दि. ८ पासून पुणे मेट्रोच्या सर्व गाड्यांमध्ये महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष राखीव जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.



पुणे मेट्रोच्या प्रत्येक गाडीत तीन डबे असून तिन्ही डब्यांमध्ये ही आसन व्यवस्था लागू करण्यात आली आहे. त्यामुळे विशेषतः महिला आणि ज्येष्ठ प्रवाशांची सोय होणार आहे. या नव्या व्यवस्थेनुसार पहिल्या डब्यात महिलांसाठी १४ आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी २ जागा राखीव असतील. मधल्या डब्यात महिलांसाठी १८ आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ४ जागा राखीव असतील. तिसऱ्या डब्यात महिलांसाठी १४ आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी २ जागा राखीव असतील. त्यामुळे प्रत्येक गाडीत महिलांसाठी एकूण ४६ आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी ८ जागा राखीव असणार आहेत. या आसन व्यवस्थेचा सविस्तर आराखडा सर्व मेट्रो स्थानकांवर तसेच अधिकृत पवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. मेट्रोच्या डब्यांमध्ये दर्शवलेल्या चिन्हांनुसार राखीव जागा ओळखून त्यानुसार बसण्याची विनंती प्रवाशांना करण्यात आली आहे. या राखीव जागांच्या नियमांचे पालन करून सहप्रवाशांना सहकार्य करण्याचे आवाहन पुणे मेट्रोकडून करण्यात आले आहे.

# नवीन मेट्रो मार्ग, रस्ते आणि पुरंदर विमानतळ... अर्थसंकल्पात पुण्यासाठी कोणत्या घोषणा करण्यात आल्या?

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात यंदा पुणे शहराच्या पायाभूत सुविधांना मोठे महत्त्व देण्यात आले आहे. शहरातील वाढती वाहतूक कोंडी, वाढणारी लोकसंख्या आणि औद्योगिक विस्तार लक्षात घेता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यासाठी अनेक महत्त्वाचे प्रकल्प जाहीर केले. विशेषतः मेट्रो, रस्ते, रेल्वे, विमानतळ आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील गुंतवणुकीमुळे पुण्याच्या विकासाला नवे बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था मजबूत करण्यासाठी पुणे मेट्रो प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्याला गती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खडकवासला ते स्वारगेट आणि हडपसर ते खराडी या मार्गांचा विस्तार करण्यात येणार असून, त्यासोबतच हडपसर ते लोणी काळभोर आणि हडपसर बस डेपो ते सासवड रोड या नवीन मेट्रो मार्गांनाही मंजुरी देण्यात आली आहे. याशिवाय रामवाडी ते वाघोली या सुमारे ११ किलोमीटरच्या नवीन मेट्रो मार्गालाही हिरवा कंदील देण्यात आला आहे. नगर रोड परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे.

पुढील टप्प्यात शहरातील प्रमुख भागांना जोडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भुयारी मार्गांचा विचार केला जात आहे. येरवडा ते कात्रज आणि हिंजवडी ते सिंहगड रोड या सुमारे ५४ किलोमीटरच्या दुहेरी भुयारी मेट्रो मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (ऊझठ) तयार करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास शहराच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतचा प्रवास अधिक वेगवान होणार आहे. पुणे आणि लोणावळा दरम्यान वाढत्या प्रवास लक्षात घेऊन रेल्वे मार्गाचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या मार्गावर तिसरी आणि चौथी रेल्वे लाईन टाकण्यासाठी सुमारे ५१०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याचा फायदा पिंपरी-चिंचवड, आकुर्डी आणि तळेगाव परिसरातील प्रवाशांना होणार आहे. रस्ते विकासाच्या दृष्टीनेही काही मोठे प्रकल्प जाहीर करण्यात आले. पुणे ते शिरूर दरम्यान ५३ किलोमीटरचा मार्ग सुमारे ७,५१४ कोटी रुपयांच्या खर्चातून उभारला जाणार आहे. तसेच तळेगाव-चाकण मार्ग आणि चाकण-शिक्रापूर मार्गाचे सहापदरीकरण करण्यात येणार आहे. या प्रकल्पांमुळे औद्योगिक पट्ट्यातील वाहतूक अधिक वेगवान होईल. याशिवाय शिरूर ते छत्रपती संभाजीनगर दरम्यान १९२ किलोमीटरचा ग्रीनफिल्ड महामार्ग उभारण्याची योजना असून त्यासाठी जवळपास १४,८८६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पाणी आणि सिंचन प्रकल्प

पुणे जिल्ह्यातील काही भागांमध्ये पाण्याची टंचाई लक्षात घेता सिंचन प्रकल्पांवरही भर देण्यात आला आहे. बारामती आणि पुरंदर तालुक्यातील अवर्षणप्रवण भागांसाठी निरा-कर्हा नदीजोड प्रकल्प राबविण्याची घोषणा करण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे शेती आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्याची शक्यता आहे.

सांस्कृतिक वारसा जपण्यावर भर

पुण्याच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे जतन करण्यासाठीही अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे. आंबेगाव परिसरातील शिवसृष्टी प्रकल्पाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच संत तुकाराम यांच्या देहू येथील जन्मस्थान आणि त्यांच्या जीर्ण घराच्या संवर्धनासाठी स्वतंत्र विकास आराखडा तयार करण्यात येणार आहे.

# उजनी धरण परिसरातील गाळपेरी जमिनींना हात लावू नका; धरणग्रस्त शेतकऱ्यांना विखे पाटील यांचा दिलासा

**इंदापूर । प्रतिनिधी**

उजनी धरण परिसरातील गाळपेरीच्या जमिनींना कोणत्याही परिस्थितीत हात लावू नये, शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच फ्लोटिंग सोलर पॉवर प्रकल्पाबाबत पुढील निर्णय होईल आदी काही महत्त्वपूर्ण निर्णय जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतल्याने उजनी धरणग्रास्तांना मोठा दिलासा मिळाला आहे. उजनी धरण परिसरातील गाळपेरी जमिनी, शेतकऱ्यांना पाठविलेल्या नोटिसा आणि प्रस्तावित प्रकल्पांमुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या दालनात महत्त्वपूर्ण उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत शेतकऱ्यांच्या हिताचे अनेक निर्णायक निर्णय घेण्यात आल्याने संबंधित तालुक्यांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाल्याचे चित्र आहे.

या वेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, आमदार राहुल कुल, माजी खासदार रणजितसिंह निंबाळकर, आमदार सदाभाऊ खोत, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, भाजपनेते प्रदीप गारटकर, माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती प्रवीण माने, शेतकरी संघटनेचे नीलेश देवकर, कोयना पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक हेमंत धुमाळ तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत इंदापूर, दौंड, कर्जत, माढा आणि करमाळा या तालुक्यांतील अनेक शेतकरी प्रत्यक्षात आपल्या जमिनीची वहिवाट करतात. त्यांना जलसंपदा विभागाकडून नोटिसा पाठविल्याने संभमाचे वातावरण निर्माण झाले होते. यावर मंत्री विखे पाटील यांनी संबंधित कारवाईला तत्काळ स्थगिती देण्याचा निर्णय जाहीर केला. गाळपेरीच्या जमिनींना कोणत्याही परिस्थितीत हात लावू नये, ज्यांची जमीन अधिग्राहित झाली आहे किंवा जे धरणग्रास्त आहेत त्यांनाच ११ महिन्यांच्या कराराने वहिवाटीसाठी जमीन द्यावी आणि याबाबत पूर्वीच्या जीआरनुसार अंमलबजावणी करावी, असे स्पष्ट निर्देश बैठकीत देण्यात आले. उजनी धरणालगत प्रस्तावित फ्लोटिंग सोलर पॉवर प्रकल्पाबाबत माहिती सर्वांना देण्यात येईल. शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच पुढील निर्णय होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. याशिवाय धरणालगत सुमारे साडेतीनशे हेक्टर पर्यटन प्रकल्पासाठी प्रस्तावित जमीन आहे. या क्षेत्रात काही शेतकरी सध्या शेती करीत आहेत. त्यांच्यावर अन्याय होऊ नये, यासाठी सविस्तर अहवाल तयार करण्याचे ठरले आहे. दरम्यान, पाटबंधारे वसाहतीचा प्रश्न सोडविण्यासाठी ती संबंधित ग्रामपंचायतीकडे वर्ग करणे किंवा स्वतंत्र महसुली सजा करण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. तसेच, धरणग्रास्तांना दिलासा देताना संबंधित सर्व विभागांत समन्वय ठेवण्याच्याही सूचना विखे पाटील यांनी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. या बैठकीत कळीचे प्रश्न मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाल्याने शेतकऱ्यांच्या संघटित लढ्याला हे यश मिळाल्याची भावना व्यक्त होत आहेत.